# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ३१

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०६.२०१४ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून २०१४ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.०६.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.जगदीश शेट्टी
१४. मा.बाबर शारदा प्रकाश
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१७. मा.पवार संगीता शाम
१८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
१९. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२०. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२१. मा.भारती फरांदे
२२. मा.जावेद रमजान शेख
२३. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२४. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२५. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२६. मा.नेटके सुमन राजेंद्र
२७. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
२९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३०. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३१. मा.लोंढे गणेश नारायण
३२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३४. मा.अपर्णा निलेश डोके
३५. मा.अनंत सुभाष को-हाळे
३६. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३७. मा.पवार मनीषा काळूराम
३८. मा.प्रसाद शेट्टी
३९. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४१. मा.शेख अस्लम शौकत
४२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४४. मा.वाबळे संजय मल्हारराव
४५. मा.मडिगेरी वर्षा विलास
४६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४८. मा.सुपे आशा रविंद्र
४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५०. मा.गोफणे अनुराधा देविदास
५१. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५२. मा.लोंढे शुभांगी संतोष
५३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५५. मा.सावळे सिमा रविंद्र
५६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
५८. मा.बहल योगेश मंगलसेन
५९. मा.कदम सदगुरु महादेव
६०. मा.गिता सुशिल मंचरकर
६१. मा.कैलास महादेव कदम
६२. मा.छाया जगन्नाथ साबळे
६३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६४. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव

६५. मा.आसवानी सविता धनराज
६६. मा.वाघेरे सुनिता राजेश
६७. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
६८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७१. मा.काळे विमल रमेश
७२. मा.पाडाळे निता विलास
७३. मा.विनोद जयवंत नढे
७४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७५. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७६. मा.विमलताई सुरेश जगताप
७७. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७८. मा.बारणे निलेश हिरामण
७९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८०. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे
८१. मा.बारणे माया संतोष
८२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८४. मा.कलाटे स्वाती मयुर
८५. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८६. मा.चौंधे आरती सुरेश
८७. मा.बोकड रामदास गेणभाऊ
८८. मा.जवळकर वैशाली राहुल
८९. मा.जगताप राजेंद्र गणपत
९०. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९१. मा.जगताप नवनाथ दत्तु
९२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९४. मा.गायकवाड संध्या सुरदास
९५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९६. मा.शेंडगे आशा सुखदेव
९७. मा.मोटे किरण बाळासाहेब
९८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९९. मा.संजय केशवराव काटे
१००. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.फुंदे, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.डॉ.रॉय - प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.पवन सावळे - अति.वैद्य.अधिकारी, मा.दुधेकर, मा.साळवी, मा.पठाण - कार्य.अभियंता, मा.कांबळे -प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे - प्र.अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशास अनुसरुन अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी नव्याने समर्पित यंत्रणा निर्माण करणेसाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर विविध संवर्गातील पदे निर्मिती बाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, कालच पांडुरंगाच्या वारीची सुरुवात झाली आहे. आज आपल्या शहरात पालखीचे आगमन होते आहे. जगदगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखीचे शहराच्या वतीने स्वागत करतो. माझी पांडुरंगाकडे प्रार्थना आहे, या वर्षी चांगला पाऊस व्हावा, चांगली कामे व्हावीत. उद्या आपल्या शहरात संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचे देखील आगमन होते आहे. आज शिक्षक व पदवीधर मतदारसंघाचे मतदान दुपारी ४.०० वा. पर्यंत आहे. आचारसंहिता चालू आहे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सभागृहाला विनंती करतो, खालील मान्यवरांचे निधन झाले आहे - डॉ.शांती पटेल-ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, गोदी कामगारांचे नेते, मुंबई महापालिकेचे माजी महापौर व माजी खासदार, Adv. व्यंकटेश उर्फ व्यंकाप्पा नारायण पत्की-समाजवादी चळवळीतील ज्येष्ठ नेते माजी आमदार, सुधाकर भालेराव-ज्येष्ठ खगोलतज्ञ, ह.भ.प. रामचंद्र बाबूराव काशिद, फुगेवाडी,पापाभाई मुलाणी, चिंचवडगांव,सुरेश पांडूरंग चव्हाण यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करुन शुक्रवार दिनांक ४/७/२०१४ रोजी दुपारी १.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत यावी अशी विनंती करतो.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, श्रद्धांजली वाहून आजची सभा शुक्रवार दिनांक ४/७/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी या सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य व आदरणीय राष्ट्रवादीचे शहरअध्यक्ष मा.योगेश बहल, आज खरेतर आनंदाचा दिवस आहे. तुकाराम महाराजांची पालखी शहरात येते आहे. विषयपत्रिकेवर दोनच विषय आहेत. विषय समिती सदस्यांची निवड आहे. गटनेते सदस्यांची नावे देतात. दुसरा एक विषय आहे. पालखी दुपारी ४ नंतर शहरात येणार आहे. तोपर्यंत ही सभा उरकली असती. हे एक कारण सांगितले आहे. तुम्ही प्रत्येकवेळी श्रद्धांजली वाहून सभा तहकूब करताय. आपले काही पदाधिकारी अमेरिकेच्या दौ-यावर गेले आहेत. सभा तहकूब करायचे नक्की कारण काय आहे?

**मा.महापौर** - आचारसंहिता असताना मिटींग घेता येत नाही हे खरे कारण आहे.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.महापौर साहेब, हे कारण ठेवून तुम्ही मिटींग तहकूब केली पाहीजे. आपण विचार केला तर शहरात रोज कुठे ना कुठेतरी व्यक्तींचे मृत्यू होत असतात. मग श्रद्धांजलीसाठी मृत व्यक्तीचे नाव शोधून त्यांना श्रद्धांजली वहायची, हा पायंडा कृपा करुन बंद पाडा. मा.महापौर साहेब, तुम्हाला ६ महिने मुदतवाढ मिळाली, त्याबद्दल आम्हाला आनंदच आहे. तुमच्या नावावर शंभर तहकूब सभांचे रेकॉर्ड होऊ नये. शंभरावी सभा तहकूब होत असताना सभेची तारीख सुद्धा डिक्लेअर केली आहे. ती का डिक्लेअर केली आहे ? आम्ही इथे सगळी काम सोडून सभेला यायचे. आणि अशा प्रकारे यांच्याकडून तारखा ऐकायच्या. मा.महापौर साहेब, आम्ही तुमच्या अडचणी समजू शकतो. आजच्या नंतर पुढील काळात एकही सभा तहकूब होऊ नये अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा.अश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब,अनुमोदन देते.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक ४/७/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३१**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०.६.२०१४ ची तहकूब सभा)**

दिनांक – ४.०७.२०१४ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २०.६.२०१४ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.४.०७.२०१४ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा. विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित
२५. मा.आर.एस.कुमार

२६.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२८.मा.पांढरकर निलेश शंकरराव
२९.मा.नेटके सुमन राजेंद्र
३०.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३२.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३३.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३४.मा.लोंढे गणेश नारायण
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३७. मा.अनंत सुभाष को-हाळे
३८.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३९.मा.जयश्री वसंत गावडे
४०.मा.प्रसाद शेट्टी
४१.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४२.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४३.मा.शेख अस्लम शौकत
४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४६.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४८.मा.सुपे आशा रविंद्र
४९.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५०.मा.अजित दामोदर गव्हाणे
५१.मा.गोफणे अनुराधा देविदास
५२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५३. मा.महेशदादा किसन लांडगे
५४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५५. मा.लोंढे शुभांगी संतोष
५६.मा.सावळे सिमा रविंद्र
५७. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५८. मा.भोसले राहूल हनुमंतराव
५९.मा.पालांडे सुजाता सुनिल
६०.मा.बहल योगेश मंगलसेन
६१. मा.पानसरे अमिना महंमद
६२.मा.कदम सदगुरु महादेव

६३.मा.गिता सुशिल मंचरकर
६४.मा.कैलास महादेव कदम
६५.मा.छाया जगन्नाथ साबळे
६६. मा.आसवानी सविता धनराज
६७.मा.वाघेरे सुनिता राजेश
६८.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७०.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७१. मा.काळे विमल रमेश
७२. मा.पाडाळे निता विलास
७३. मा.विनोद जयवंत नढे
७४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७५. मा.विमलताई सुरेश जगताप
७६.मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७७. मा.बारणे निलेश हिरामण
७८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७९.मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे
८०.मा.बारणे माया संतोष
८१. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८२.मा.यमुनाताई रमणनाना पवार
८३.मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८४.मा.कलाटे स्वाती मयुर
८५. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८६.मा.चौंधे आरती सुरेश
८७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८८.मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
८९.मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०.मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९२.मा.जगताप राजेंद्र गणपत
९३.मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४.मा.जगताप नवनाथ दत्तु
९५.मा.तनपुरे सुषमा राजेंद्र
९६.मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९७.मा.जम सोनाली पोपट
९८.मा.प्रशांत शितोळे
९९.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१००. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०१. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०३. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०४. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०५. मा.संजय केशवराव काटे
१०६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०७. मा.पाटील सुजित वसंत
१०८. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्य लेखापाल, मा.डॉ.मनोज देशमुख-अति.वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक नगररचना,मा.दुधेकर,मा.निकम,मा.सवणे,मा.काची,मा.चव्हाण, मा.साळवी,मा.पठाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेटटी, मा.कांबळे-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे- प्र.अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(नवनियुक्त मुख्यलेखापरिक्षक मा.पदमश्री तळदेकर यांनी त्यांची ओळख सभागृहास करुन दिली तसेच मा.महापौर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.)

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब, पै.मारुती सहादू कंद - कबड्डीचे राष्ट्रीय खेळाडू, बाळाजी शंकर बारणे - (सामाजिक कार्यकर्ते) माननीय खासदार श्रीरंग (आप्पा) बारणे यांचे चुलते, पोपटराव चिंचवडे - नगरसदस्या अश्विनी गजानन चिंचवडे (पाटील) यांचे सासरे, पंडित विठ्ठल सोनवणे - माजी ग्रामपंचायत समिती सदस्य चिखली -सोनवणेवस्ती यांचे दुखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.अरुण बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन आहे.

मा.महापौर - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

-----------

मा.महापालिका विशेष सभा क्र.२७ दि.२४/०२/२०१४ व दि.२८/०२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

## नियुक्त्या

**विषय क्रमांक – १**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे :-

(१) विधी समिती -
(टिप-विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(२) महिला व बालकल्याण समिती –
अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.
ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

(३) शहर सुधारणा समिती
(टिप-शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(४) क्रिडा समिती
(टिप-क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे ४ (चार) विशेष समित्या नेमणे. विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.

(१) विधी समिती – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.
विधी समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने विधी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह

नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत विधी समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे,२) मा.वाबळे संजय मल्हारराव, ३) मा.पालांडे सुजाता सुनिल,४) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन, ५) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव,६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.शकुंतला बनसोडे, ८) मा.मासुळकर समीर मोरेश्वर, ९) मा.विमल सुरेश जगताप या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

**<u>मा.नगरसचिव</u>** – (२) महिला व बालकल्याण समिती –

(अ)महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर २ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ०१, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - ०१, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद व २) मा.जयश्री गावडे या पालिका सदस्यांच्या

महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव -</u>** (२) (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर ७ महिला सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी - ८४, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या महिला सदस्यांची संख्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी - ०५, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - ०१, शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) - ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर महिला सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.काळभोर वैशाली जालिंदर, २) मा.जाधव साधना रामदास, ३) मा.आल्हाट मंदा उत्तम, ४) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ५) मा.बो-हाडे शुभांगी संजय, ६) मा.भालेकर अरुणा दिलीप, ७) मा.संगिता शाम पवार या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव –</u>** (३) शहर सुधारणा समिती –

शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[शहर सुधारणा समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने शहर सुधारणा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती

(आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.आर.एस.कुमार, २) मा.उल्हास शेट्टी, ३) मा.सौ.छाया जगन्नाथ साबळे, ४) मा.नेटके सुमन राजेंद्र, ५) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा.सविता आसवानी, ८) मा.जवळकर वैशाली राहूल, ९) मा.सौ.अश्विनी गजानन चिंचवडे (पाटील) या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

<u>**मा.नगरसचिव**</u> – (४) क्रिडा समिती –

क्रिडा समितीवर ०९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[क्रिडा समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२२,शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने क्रिडा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) – १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत क्रिडा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.तानाजी विठ्ठल खाडे, २) मा.लोंढे

शुभांगी संतोष, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४) मा.मोटे किरण बाळासाहेब, ५) मा.सुपे आशा रविंद्र, ६) मा.सौ.साळुंके सविता सुरेश, ७) मा.गिता मंचरकर, ८) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ, ९) मा.निलेश हिरामण बारणे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -४८३ | विषय क्रमांक - १ |
| दिनांक - ४/७/२०१४ | विभाग - नगरसचिव |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे १) मा.विधी समिती, २) मा.महिला व बालकल्याण समिती, ३) मा.शहर सुधारणा समिती, ४) मा.क्रिडा समिती या ४ (चार) विशेष समित्या नेमण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच

१) **<u>मा.विधी समिती</u>** – मा.विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, २) मा.वाबळे संजय मल्हारराव, ३) मा.पालांडे सुजाता सुनिल, ४) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन, ५) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव, ६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.शकुंतला बनसोडे, ८) मा.मासुळकर समीर मोरेश्वर, ९) मा.सौ.विमल सुरेश जगताप या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच –

२) **<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>** - अ) मा.महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता /विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद व २) मा.जयश्री गावडे या पालिका सदस्यांच्या व (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील

पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.काळभोर वैशाली जालींदर, २) मा.जाधव साधना रामदास ३) मा.आल्हाट मंदा उत्तम, ४) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ५) मा.बो-हाडे शुभांगी संजय, ६) मा.भालेकर अरुणा दिलीप, ७) मा.सौ.संगीता शाम पवार या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच –

**३) <u>मा.शहर सुधारणा समिती</u>** – शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.आर.एस.कुमार, २) मा.उल्हास शेट्टी, ३) मा.सौ.छाया जगन्नाथ साबळे, ४) मा.नेटके सुमन राजेंद्र, ५) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा.सविता आसवानी, ८) मा.जवळकर वैशाली राहूल, ९) मा.सौ.अश्विनी गजानन चिंचवडे (पाटील) या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

४) **<u>मा.क्रिडा समिती</u>** – मा.क्रिडा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.तानाजी विठ्ठल खाडे, २) मा.लोंढे शुभांगी संतोष, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४) मा.मोटे किरण बाळासाहेब, ५) मा.सुपे आशा रविंद्र, ६) मा.सौ.साळुंके सविता सुरेश, ७) मा.गिता मंचरकर, ८) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ, ९) मा.निलेश हिरामण बारणे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी – ४११ ०१८.**

---------------

मा.वैशाली काळभोर - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - ४/७/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सदगुरु कदम मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव -
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/०५/२०१४ ठराव क्रमांक ६८६१ नुसार.

वैष्णवी विनोद जगताप हिने नॅशनल पॅरा ऑलम्पिक स्पर्धेत सहा सुवर्ण एक कास्य पदक मिळविले असून तिची दिनांक ६ ते १० ऑगष्ट २०१४ या कालावधीत पॅसेडेना (कॅलिफोर्निया अमेरिका) येथील जागतिक पॅराऑलम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर खेळाडू महापालिकेच्या दत्तक खेळाडू योजनेची सभासद असून सदर स्पर्धेत भाग घेणेसाठी येणारा खर्च त्यांच्या आवाक्या बाहेरचा असल्याने विशेष बाब म्हणून त्यांस र.रु.दोन लाख नव्वद हजार अर्थसहाय्य मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

मा.उल्हास शेटटी – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – “विशेष बाब म्हणून त्यास” या मजकुरानंतरचा सर्व मजकुर वगळून “१) कु.वैष्णवी विनोद जगताप, कामगारनगर, पिंपरी २) कु.तुषार अभिजित नलावडे, चिंचवड, पुणे हे दोन खेळाडू म.न.पा. खेळाडू दत्तक योजना मध्ये असल्यामुळे, या दोन खेळाडूंची पेसाडेना, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे होणा-या पॅनपॅसिफिक अपंगांच्या आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेकरीता निवड झाल्याने सदर स्पर्धेसाठी जाणेकामी, माहे जानेवारी २०१४ च्या मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या क्रीडा धोरणातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे व खेळाडू दत्तक योजना बाबतच्या अटी व शर्तीनुसार व नमूद केलेप्रमाणे प्रती खेळाडू आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- मंजूर करणेस तसेच चि.संकल्प सतीश बोत्रे, संत तुकाराम नगर, पिंपरी या खेळाडूंची पेसाडेना, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे होणा-या पॅनपॅसिफिक अपंगांच्या आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेकरीता निवड झाल्याने सदर स्पर्धेसाठी जाणेकामी, माहे जानेवारी २०१४च्या मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या क्रीडा धोरणातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणेबाबतच्या अटी व शर्तीनुसार व नमूद केलेप्रमाणे त्यास आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- मंजूर करणेस व सदर ३ खेळाडू अपंग असल्यामुळे आर्थिक सहाय्यची रक्कम त्यांचे पालकांचे नावे अदा करणेस मान्यता देणेत यावी. ” असा मजकुर समाविष्ट करण्यात यावा.

मा.योगेश बहल- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.वैशाली काळभोर- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -४८४ विषय क्रमांक - २
दिनांक - ४/७/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.सदगुरु कदम, मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव -
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/०५/२०१४
ठराव क्रमांक ६८६१ नुसार

वैष्णवी विनोद जगताप हिने नॅशनल पॅरा ऑलम्पिक स्पर्धेत सहा सुवर्ण, एक कास्य पदक मिळविले असून तिची दिनांक ६ ते १० ऑगष्ट २०१४ या कालावधीत पॅसेडेना (कॅलिफोर्निया अमेरिका) येथील जागतिक पॅराऑलम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर खेळाडू महापालिकेच्या दत्तक खेळाडू योजनेची सभासद असून सदर स्पर्धेत भाग घेणेसाठी येणारा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा असल्याने विशेष बाब म्हणून १) कु.वैष्णवी विनोद जगताप, कामगारनगर, पिंपरी २) कु.तुषार अभिजित नलावडे, चिंचवड, पुणे हे दोन खेळाडू म.न.पा. खेळाडू दत्तक योजनामध्ये असल्यामुळे, या दोन खेळाडूंची पेसाडेना, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे होणा-या पॅनपॅसिफिक अपंगांच्या आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेकरीता निवड झाल्याने सदर स्पर्धेसाठी जाणेकामी, माहे जानेवारी २०१४ च्या मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या क्रीडा धोरणातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे व खेळाडू दत्तक योजना बाबतच्या अटी व शर्तीनुसार व नमूद केलेप्रमाणे प्रती खेळाडू आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- मंजूर करणेस तसेच चि.संकल्प सतीश बोत्रे, संत तुकाराम नगर, पिंपरी या खेळाडूंची पेसाडेना, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे होणा-या पॅनपॅसिफिक अपंगांच्या आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेकरीता निवड झाल्याने सदर स्पर्धेसाठी जाणेकामी, माहे जानेवारी २०१४च्या मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या क्रीडा धोरणातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणेबाबतच्या अटी व शर्तीनुसार व नमूद केलेप्रमाणे त्यास आर्थिक सहाय्य र.रु.१,००,०००/- मंजूर करणेस व सदर ३ खेळाडू अपंग असल्यामुळे आर्थिक सहाय्यची रक्कम त्यांचे पालकांचे नावे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.मंदाकिनी ठाकरे - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४८५ विषय क्रमांक - ३
दिनांक - ४/७/२०१४ विभाग – नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

दिनांक २६/०३/२०१४ व ०९/०४/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.मंदाकिनी ठाकरे - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -४८६ विषय क्रमांक - ४

दिनांक - ४/७/२०१४ विभाग – नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

(अ) दिनांक २०/०२/२०१४, २५/०२/२०१४, ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

(ब) दिनांक ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.वैशाली काळभोर – मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - ४/७/२०१४ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दवनि/६/कावि/५६/२०१४ दिनांक - २०/ ०६/ २०१४

मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी श्रीमती जयश्री डांगे विरूध्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर या जनहित याचिका क्र.२०७/२०१० च्या सुनावणी मध्ये दि.४ ऑक्टोबर २०१३ रोजी महानगरपालिकेस निर्देश दिलेले आहेत. त्यानंतर मनपाने केलेली कार्यवाही व त्याबाबतच्या अंमलबजावणीसाठी येणा-या अडचणीबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचा विचार करून दिनांक ०५/०५/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयात तपशिलवार चर्चा व सुनावणी झालेली आहे. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.०५/०५/२०१४ रोजी प्रामुख्याने खालील निर्देश दिलेले आहेत.

(१) मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार महापालिका परिसरात सध्या ६६००० पेक्षा जास्त अनधिकृत बांधकामे असुन त्यांची व्याप्ती विचारात घेता महापालिकेकडे सध्या असलेले तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सध्या नेमून

दिलेली इतर कामे व अनधिकृत बांधकामांवर करावयाची कारवाई यांची तुलना करता सदर मनुष्यबळ कमी असुन या अतिरिक्त व कालबध्द कार्यवाहीसाठी वाढीव पदांची आवश्यकता असून त्याबाबतचा प्रस्ताव मनपाने तयार करून त्यास महासभेची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण करून त्यांचेकडील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.

(२) म.न.पा.ने शासनाकडे सादर केलेल्या नवीन पद निर्मितीच्या प्रस्तावास राज्य शासनाने त्यापुढील ९० दिवसात मान्यता देणेबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.

**(३)**महापालिकेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) नुसार नोटीस दिल्यानंतर जर संबंधित व्यक्तीने सदर अधिनियमाचे कलम ५३(३) नुसार नियमितीकरणाकामी अर्ज केल्यानंतर सदर प्रकरण लवकरात लवकर निकाली काढणे व त्यानुसार पुढील योग्यती कायदेशिर कार्यवाही करणे.

<u>महाराष्ट्र शासनाकडील २ मार्च २००९ च्या शासन निर्णयातील ठळक निर्देश खालील प्रमाणे आहेत-</u>

<u>संरचनात्मक सुधारणा</u> -

**(१) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण करणेः-**

**(अ)अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन पथक निर्माण करणे**

**(आ) नागरी पोलीस प्रतिनियुक्तीवर महानगरपालिकांकरिता अनिवार्य**

**(२) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे स्थापन करणे**

**(३) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा स्थापन करणे**

वरील ठळक निर्देशामधील मुद्दा क्र **(१)** मधील **(२) नागरी गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विशेष पोलीस ठाणे स्थापन करणे** – स्वतंत्र पोलीस पथकास मान्यता मिळणेबाबत पत्र क्र. प्रशासन/१अ/कावि/७४२/२०१३, दि.१०/०७/२०१३ अन्वये प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी महापालिकेकडून स्था/शअ/पीए/५२९/२०१३ दिनांक २३/१०/२०१३ अन्वये स्मरणपत्र पाठविणेत आले आहे. अद्यापही सदर प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनधिकृत बांधकाम /अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण करणे**– यासाठी स्वतंत्र पदे निर्माण करणे व त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. या कामी आवश्यक त्या पदनिर्मितीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही गट ‘क’ मधील असून महानगरपालिकेबाबतची भौगोलिक माहिती खालील प्रमाणे आहे –

| | |
|---|---|
| महानगरपालिकेचे क्षेत्रफळ | १७७.३० चौ.कि.मी. |
| महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या | १७,२९,३५९ |
| महानगरपालिका क्षेत्रात एकुण द्विस्तरीय निवडणूक प्रभाग संख्या | ६४ |
| नगरसदस्य संख्या | १२८+५ (स्विकृत) |
| क्षेत्रीय कार्यालये संख्या | ६ |
| मिळकतींची संख्या मार्च २०१४ अखेर | ३,८०,३२७ |
| प्रत्येक निवडणूक प्रभागनिहाय अंदाजे सरासरी लोकसंख्या | २७,०२१ |

महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करणेसाठी सद्यस्थितीत स्थापत्य विभागाचे कनिष्ठ अभियंता, उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांचे मार्फत कारवाई करण्यात येत आहे. तसेच, सद्यस्थितीत बीट निरिक्षक म्हणून मनपाचे निवडणूक वार्ड निहाय कार्यरत असलेले आरोग्य निरिक्षक/मिटर निरिक्षक/करसंकलन निरिक्षक कामकाज करीत आहेत. तथापि, सदर यंत्रणा वरील कामकाजात व्यस्त असल्यामुळे मनपाच्या विकास कामांवर व इतर नागरी सुविधांवर विपरीत परिणाम होत आहे. सबब अनधिकृत बांधकामांवरील कार्यवाही/कारवाईसाठी महापालिकेकडे समर्पित यंत्रणा असणे आवश्यक आहे.

याबाबत मा.उच्च न्यायालयाने दोन महिन्यांचे कालावधीत महापालिकेने अंतिम निर्णय घेऊन नवीन पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे बंधनकारक केले आहे. महापालिकेकडील पद निर्मितीच्या प्रस्तावाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

सद्यस्थितीत मनपा कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर/अतिक्रमणावर स्थापत्य विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत बांधकामाचा पंचनामा करणे, अनधिकृत बांधकामधारकास नोटीस तयार करून प्रत्यक्ष बजाविणे, संबंधितांवर गुन्हा दाखल करणे व त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, अनधिकृत बांधकाम प्रत्यक्ष निष्कासन करणे, या संदर्भात संबंधित पोलीस स्टेशन येथे आवश्यकतेनुसार हजर राहणे, व मा. न्यायालयात सुनावणीसाठी हजर राहणे,इ. कामकाजाचा अंतर्भाव आहे. काही प्रकरणी अनधिकृत बांधकामास नोटीस बजाविल्यानंतर संबंधित अनधिकृत बांधकामधारक महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीनुसार सदर बांधकाम नियमीतीकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम मधील कलम ५३(३) नुसार मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाकडे प्रकरण सादर करतो. बांधकाम परवानगी विभाग मा. शहर अभियंता यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र कामकाज करते. त्यामुळे सदर विभागाकडे अशा प्रकारे नियमितकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रकरणांबाबत झालेल्या निर्णयाबाबत स्थापत्य विभागास कल्पना नसल्याने कायदेशिर अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यासाठी, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन यासाठी एकत्रित स्वतंत्र कक्ष निर्माण केल्यास कामकाजात सुसुत्रता राहून निर्माण होऊ शकणा-या कायदेशिर अडचणी टाळल्या जाऊ शकतील.

अनधिकृत बांधकामांना कायदेशीर तरतुदीस अनुसरुन नोटीसा देणे, तदनुषंगिक सर्व कार्यवाही पूर्ण करणे. सदर कामाची व्याप्ती मोठया प्रमाणावर असुन त्यावर रितसर कायदेशीर तरतुदीस अनुसरुन कार्यवाही करण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागणार आहे. या कामी कायदेशीर कार्यवाही/कारवाई ही सातत्याने व निरंतर चालू ठेवणेसाठी सदर बाबतची जबाबदारी महापालिकेमध्ये बांधकाम परवानगी विषयक कार्यवाही ज्या विभागाकडून होत आहे त्याच विभागातील संबंधित क्षेत्रासाठी नियुक्त असलेल्या पदनिर्देशित अधिका-यांना यांना देणे योग्य होईल. नियुक्त केलेल्या भागासाठीचे पदनिर्देशित अधिकारी हे बांधकाम परवानगी देणे, सदर भागातील अनधिकृत बांधकामाबाबत आवश्यक ती कायदेशीर रितसर कार्यवाही/ कारवाई करणे ही जबाबदारी त्याच पदनिर्देशित अधिका-याच्या नियंत्रणाखाली ठेवल्यास त्याची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल.

वरील नमूद केलेप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे आदेश व शासनाचे निर्देशानुसार अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करणेसाठी **स्वतंत्र, समर्पित, सक्षम यंत्रणा निर्माण** करणेसाठी सोबतच्या **परिशिष्ट क** नुसार **विविध संवर्गातील नव्याने निर्माण करावयाची पद संख्या** अधिकारी / कर्मचारी संख्या निश्चित करण्यात आलेली आहे व त्यासाठी लागणारा संभाव्य आस्थापना विषयक खर्चाचा तपशील **परिशिष्ट इ** प्रमाणे सादर करणेत आलेला आहे.

वरील परिशिष्ट क व त्यासोबतचे प्रपत्र-१ यामध्ये नमूद अधिकारी / कर्मचारी यांची कार्यपध्दती व जबाबदारी विहित करण्यात आली असून त्याचे कृपया अवलोकन व्हावे.

**प्रस्तावित विभाग एकुण दोन कक्षात विभागला जाईल -**

**१) बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणावरील नियंत्रण कक्ष**
**२) विभागाचा आस्थापना कक्ष**

वरील कक्षांची संक्षिप्त कार्यपध्दती व जबाबदारी खालील प्रमाणे-

**बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणावरील नियंत्रण कक्षः-**

सदर कक्षाचे कामकाज मा. शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली असेल. प्रत्येकी दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी एक कार्यकारी अभियंता, प्रत्येकी दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी १ नायब तहसिलदार, प्रत्येक दोन क्षेत्रीय कार्यालयासाठी ७ उपअभियंता, प्रत्येक वार्डासाठी १ कनिष्ठ अभियंता, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी २ सर्व्हेअर, १ आरेखक,१ अनुरेखक, प्रत्येक वार्डासाठी १ बीट निरिक्षक / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी १ कॉम्प्यूटर ऑपरेटर, १ लिपिक, १ अतिक्रमण निरिक्षक,१ वायरमन, १ प्लंबर,१ वेल्डर, १ जेसीबी/पोकलॅन ऑपरेटर, २० मजूर, इ. याप्रमाणे विविध संवर्गातील पदे आवश्यक आहेत. सहा क्षेत्रीय कार्यालयांसाठी एकुण पदसंख्या बाबतचे **परिशिष्ठ क** सोबत जोडले आहे. व यासाठी संभाव्य वार्षिक आस्थापना खर्चाचा तक्ता **परिशिष्ठ इ प्रमाणे** सोबत जोडला आहे**.**

प्रचलित पध्दतीनुसार, बांधकाम परवानगी प्रकरणांचे कामकाज सदर कक्षामार्फत करण्यात येईल. तसेच, वार्डात बीट निरिक्षकास आढळून आलेल्या अथवा इतर तक्रारीद्वारे उपलब्ध झालेल्या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण प्रकरणांबाबत संबंधित बीट निरिक्षक सदर प्रकरणाबाबतचे सर्व कागदपत्रे उपलब्ध करणे, सविस्तर पंचनामा करून सदर प्रकरण संबंधित कनिष्ठ अभियंता (बां.प.) यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी देणे, संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्रकरणाची खातरजामा करून संबंधित अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणधारकास कायदेशिर नोटीस तयार करणे व संबंधित उपशहर अभियंता (बां.प.) यांच्या स्वाक्षरीने सदर नोटीस संबंधितास बजाविणे,सदरचे अनधिकृत बांधकाम धारकाने कायद्यातील तरतूदीनुसार मनपाकडे नियमीतीकरणासाठी प्रकरण सादर केल्यास त्याबातची छानणी करून प्रकरणाबाबत निर्णय घेणे, नोटीस मधील विहित मुदत संपल्यानंतर संबंधिताने अनधिकृत बांधकाम स्वतः काढून घेतल्यास अनधिकृत बांधकामधारकाविरूध्द गुन्हा दाखल करणे, पोलीस संरक्षणासाठी पत्रव्यवहार व वारंवार पाठपुरावा करणे, पोलीस संरक्षण उपलब्ध झाल्यानंतर प्रत्यक्ष निष्कासनाची कारवाई करणे. केलेल्या कारवाईचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करणे, या संपूर्ण प्रक्रियेबाबत ठरलेल्या टप्प्यांनुसार अनधिकृत बांधकामाबाबतच्या संकेतस्थळावर नियमित माहिती अद्यावत करणे, दाखल केलेल्या गुन्ह्याबाबत मा. न्यायालयात सुनावणीसाठी वेळोवेळी उपस्थित राहणे,इत्यादी कामकाज सदर कक्षामार्फत करणे प्रस्तावित आहे.

**विभागाचा आस्थापना कक्ष -**

सदर कक्षामध्ये नायब तहसिलदार, लेखापाल, उपलेखापाल, मुख्यलिपिक, लिपिक इ. पदांचा समावेश असेल. सदर कक्षामार्फत संपूर्ण कक्षाचे मासिक वेतन काढणे, वाहन इंधन व दुरूस्ती व इतर आस्थापना विषयक कामकाज करणे प्रस्तावित आहे.

सदर समर्पित कक्षासाठी नवनिर्मित पदावर नियुक्त कर्मचा-यांना किमान ५ वर्षे या कक्षाकडेच काम करणे बंधनकारक ठेवणे उचीत राहिल.

वर नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडील २ मार्च २००९ च्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.०५/०५/२०१४ रोजीच्या निर्देशांचे तपशीलवार विवेचन व अवलोकन करता अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी नव्याने समर्पित यंत्रणा निर्माण करणेसाठी **त्याबाबतचा प्रस्ताव मनपाने तयार करून त्यास सक्षम समितीची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण करून त्यांचेकडील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे** व त्याबाबतचा पूर्तता अहवाल प्रतिज्ञापत्र स्वरूपात मा. उच्च न्यायालयास दि. ४ जुलै २०१४ रोजी सादर करावयाचा आहे. **मा. उच्चन्यायालयाने निर्देश दिल्यानुसार विहीत मुदतीत म्हणजेच ३० जून २०१४ पर्यंत सदर बाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर न केल्यास मा. उच्चन्यायालयाच्या आदेशाचा अवमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी सदरचा विषय मान्यतेसाठी नजीकच्या होणा-या मा. महापालिका सभे पुढे ठेऊन मान्यता घेणे आवश्यक आहे.**

त्यानुसार, **<u>मा.स्थायी समितीने ठराव क्र. ७०१४, दि. १२/०६/२०१४</u>** अन्वये **समर्पित, सक्षम यंत्रणेसाठी नव्याने पदे निर्माण करणे** व त्याअनुषंगाने येणा-या वार्षीक संभाव्य खर्चास (सोबतच्या परिशिष्ट क व इ मध्ये नमूद केले प्रमाणे) मान्यता देणेत येत आहे.

## परिशिष्ट क

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष
मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवक वर्ग

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | आवश्यक पदसंख्या | सध्या अस्तित्वातील पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ७६०० | १ | १ | ० | |
| २ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ६६०० | ३ | १ | २ | |
| ३ | उपअभियंता | १५६००-३९१००<br>ग्रेड पे ५४०० | २२ | ३ | १९ | |
| ४ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४६०० | ७२ | १० | ६२ | |
| ५ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २८०० | ७२ | ० | ७२ | |
| ६ | सर्व्हेअर | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २८०० | १२ | १२ | ० | |
| ७ | आरेखक | ५२००-२०२००<br>ग्रेड पे ४२०० | ६ | ६ | ० | |
| ८ | अनुरेखक | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| ९ | कॉम्पूटर ऑपरेटर | ५२००-२०२००<br>ग्रेड पे ४३०० | ६ | ६ | ० | |
| १० | नायब तहसिलदार | ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४४०० | ३ | ३ | ० | |
| ११ | लिपिक | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | २७ | २७ | ० | |
| १२ | उपलेखापाल | ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४३०० | ३ | ३ | ० | |
| १३ | अतिक्रमण निरीक्षक | ५२००-२०२००<br>ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| १४ | मजूर | ५२००-२०२००<br>ग्रेड पे १९०० | १२० | १२० | ० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | लघुलेखक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | ३ | ३ | ० | |
| १६ | शिपाई | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | १४ | १४ | ० | |
| १७ | वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ७ | ७ | ० | |
| १८ | जेसीबी/पोकलेन ऑपरेटर | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| १९ | वायरमन | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| २० | प्लबंर | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| २१ | वेल्डर | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० | ६ | ६ | ० | |
| | **एकुण** | | **४०७** | **२५२** | **१५५** | |

**सही/-**
**आयुक्त,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी, पुणे १८.**

**परिशिष्ट क**

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष
मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवक वर्ग

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | आवश्यक पद संख्या | सद्या अस्तित्वातील पदे | नव्याने निर्माण करावयाचे पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | ३ | १ | २ | |
| २ | उपअभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २२ | ३ | १९ | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | ७२ | १० | ६२ | |
| ४ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | ७२ | ० | ७२ | |
| | **एकुण** | | **१६९** | **१४** | **१५५** | |

सही/-
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे १८.

**परिशिष्ट इ**

बांधकाम परवानगी व अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलनासाठी कक्ष

मनपा आस्थापनेवर नव्याने निर्माण करावयाचा सेवकांचा संभाव्य वार्षिक आस्थापना खर्च

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी अधिक मान्य भत्ते | नव्याने निर्माण करावयाचे पदे | संभाव्य वार्षिक खर्च / आर्थिक भार रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | २ | १४,५८,८६० | |
| २ | उपअभियंता | १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | १९ | १,१८,९०,५८० | |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० ग्रेड पे ४६०० | ६२ | ३,१३,११,४८८ | |
| ४ | बीट निरीक्षक/ स्थापत्य अभियांत्रिकी सहा. | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० | ७२ | २,३८,९७,९५२ | |
| | **एकुण** | | **१५५** | **६,८५,५८,८८०** | |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरलिका
पिंपरी, पुणे १८

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.दत्ता साने-** मा.महापौर साहेब या विषयावर संबंधितांनी खुलासा करावा.

**मा.कांबळे (प्र.शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका विरोधात एक जनहीत याचीका उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेली होती. त्यामध्ये ५/५/२०१४ रोजी जे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत त्याप्रमाणे आपल्याला ही यंत्रणा लागणार आहे त्याचा प्रस्ताव ६० दिवसामध्ये शासनाकडे सादर करण्याचे आदेश आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मा.दत्ता साने-** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, आज हा अनधिकृत बांधकामाचा विषय आणि त्या संदर्भात लागणारी यंत्रणा आणि त्या यंत्रणाच्या माध्यमातून सभागृहापुढे हा ठराव आलेला आहे. खरंतर हा विषय ज्या माध्यमातून आपण समोर आणलेला आहे तो विषय पदनिर्मितीचा आहे पण हा विषय् सर्वाच्या जीवनमरणाचा विषय झालेला आहे आज आपण सांगतो ६६ हजार अनधिकृत बांधकाम आहेत त्यासाठी यंत्रणा लागणार आहे. परंतु परस्थिती ही वेगळी आहे पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनधिकृत बांधकाम दोन ते आडीच लाख आहेत असं यापुर्वी आपण जाहीर केलेले आहे मग ६६ हजार बांधकामे आहेत का अडीच लाख

बांधकाम आहेत हा प्रश्न आहे. जर ६६ हजार असतीलतर ती कुठली, कशी, कुठे आणि कुठल्या माध्यमातून घेतलेले आहेत याचा खुलासा होणे आवश्यक आहे. ६६ हजार बांधकाम अनधिकृत आहेत तर ती कुठल्या सालापासून कुठल्या साला पर्यंत आहेत. ३१ मार्च १२ पर्यंतची आहेत का नंतरची आहेत अशा परिस्थितीत हा प्रकार चुकिचा आहे. हा ठराव फेटाळून लावावा अशी विनंती आहे. हा विषय घेत असताना पिंपरी चिंचवड शहरामधील शास्तीकराचा विषय अतीशय जीवंत झालेला आहे आणि त्या शास्तीकराच्या माध्यमातून सर्व पिंपरी चिंचवड शहर भयभीत झालेले आहे. पुर्वी आपण म्हणाले होते की ३१ मार्च १२ नंतरच्या घराला शास्तीकर लावायचा. आता आपण २००८ नंतरचा वसुली करायचे काम चालू झालेले आहे. जीवंत उदाहरण देण्यासाठी मी आपल्याला विनंती करतो की जर पिंपरी चिंचवड मनपामध्ये नवीन १८ गावे १९९७ ला आलेली असताना आम्हांला २००८ पर्यंत शासनाने जीआर काढून आमचा टॅक्स माफ केलेला आहे. ज्यावेळेस आम्हांला पिंपरी चिंचवड मध्ये घेतले त्यावेळेच्या पुर्वीच्या मिळकती या सर्व मिळकती लीगल आहेत असे असताना आम्हांला तुम्ही १९९७ ला आपल्या महापालिकेमध्ये घेतलेले असताना आम्हाला नोटिसा आलेल्या आहेत. जे बांधकाम आहे त्याचा नाहरकत दाखला आहे १६/७/९७ ला या मिळकतीला ग्रामपंचायतीने नाहरकत दाखला दिलेला आहे. ग्रामपंचायतीचा उतारा सुध्दा १३/७/९७ चा आहे असे असताना त्याला आपण लेटर पाठविले आहे ते असे आहे की नोटिशी प्रमाणे आपण अनधिकृत बांधकाम काढून न टाकल्यास हे सदरचे अनाधिकृत बांधकाम काढून टाकणेत येईल हा अनागोंदी प्रकार आहे. आपले लोक झोपलेले आहेत की काय? का यामध्ये काही वेगळा प्रकार चाललेला आहे की काय. ती घर जूनी आहेत. ९७ चे बांधकाम अनाधिकृत ठरवून लोकांना भयभीत करत असालतर ते योग्य नाही. कुठल्या नियमाप्रमाणे ९७ चे बांधकामाला नोटीस देवून अनाधिकृत करता ही घरे जुनी आहेत ती पाडा म्हणून आपण म्हणत असालतर मला वाटते याच्यापेक्षा दु:ख दुसर कोणत नाही. यामुळे पिंपरी चिंचवड शहर उध्दवस्त कराव लागेल. त्यामुळे आपल काही डेव्हलपमेंट चालल की काय असं वाटतय. सामान्य लोकांचा कर १०० रु. असेलतर ५०० रुपये त्याला शास्तीकर भरायचा आहे. आपल्याकडे कामगारनगरी आहे. आपल्या शहरामध्ये विवीध राज्यातून, महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून पोटापाण्यासाठी लोक आलेले आहेत. लोकांनी पै पै साठी गावाकडच्या शेतजमिनी विकलेल्या आहेत आमच्या आई-बहीणींचे दागदागीने विकलेले आहेत, मंगळसुत्र मोडलेले आहेत आणि अशा बांधकामावर आपण आज बुलडोझर फिरविणार, शास्तीकर लावणार हे काय चालले, हे आम्हांला समजत नाही. माझी विनंती आहे की याच्यामध्ये लवकरात लवकर लक्ष घालावे. लोकसभेला आपण धडा शिकलेलो आहोत आता विधानसभा जवळ आलेली आहे नागरीकांच्या समोर जायचे आहे. ८० ते ९० टक्के लोकांना अनाधिकृत बांधकामाच्या नोटिसा चाललेल्या आहेत. आपल्याला विनंती आहे मी काल आपल्याला पत्र दिलेले आहे. आपण त्या ठिकाणी नव्हतात. मी पत्र अधिकृत दिलेले आहे हे ताबडतोब थांबविले पाहिजे. अन्यथा होणा-या परिणामाला महापालिका किंवा आपले अधिकारी जबाबदार असतील. या शास्तीकराच्या नोटिसा थांबविल्या पाहिजेत. राष्ट्रवादी तर्फे मी जाहीर करतो की शास्तीकर कुठल्याही नागरीकांनी भरु नये. कुठला कर? कसला कर? काय चालल आहे. कुठल्या दिशेला आम्हांला घेवून चाललंय. एका बाजूला आपण सांगतो ही पिंपरी चिंचवड श्रीमंत महापालिका आहे या श्रीमंत महानगरपालिके मध्ये लोक राहणारी श्रीमंत हवीत.

याठिकाणी लोक तरी राहायला पाहिजेत. त्यांना कशाला श्रीमंतीपणा सांगता त्यांना हिटलरशाही कायदा लावणार आहेत काय. तशी वागणूक देत असेलतर ती अन्यायकारक आहे. रेडझोनमध्ये आपण कुठल्याही सुविधा देत नाहीत. पाणी, रस्ते, लाईट देत नाही अशा ठिकाणी आपण शास्तीकर गोळा करायला करसंकलनाच्या माध्यमातून कोणी अधिकार दिलेला आहे. करसंकलनाच्या माध्यमातून त्यांच्याकडे येण्यास कुठला अधिकार तुम्हांला दिलेला आहे. कुठल्या कायदयामध्ये सांगीतले आहे की त्यांना सुविधा द्यायच्या नाहीत.  काही काम सांगीतले की रेडझोन आहे असे सांगीतले जाते. त्यांना नागरी सुविधा दिल्याच पाहिजेत त्याठिकाणी सुध्दा नागरीकच राहतात. त्यांचा तो नागरी हक्क  आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा मिळाल्या पाहिजेत. तो हक्क आपण हिरावून घेतो रेडझोन कुठ आहे काय आहे ते ना केंद्रशासनाला माहिती ना राज्यशासनाला माहिती. तो हक्क कोणी आपल्याला दिलेला आहे. मला जसं आठवतंय तसं आमच चिखली गाव रेडझोनमध्ये असल्याच ऐकलच नव्हत. असं असताना हे आणल कोणी हे ठेवलय कोणा समोर,  हे पुर्वीच् का आणल नाही आता लोकांना भयभीत करण्याच काम चाललेलं आहे. लोकांना स्लो पॉयझन द्यायच काम चाललय का?  हाळू हाळू स्लो पॉयझन देण्याच काम चाललय. त्यांना मारायचतर एकदम मारायच नाही, हाळू हाळू मारायच चाललेल आहे. याठिकाणी कुठली सिटी आणून उभी करायची की काय? अनधिकृत बांधकामाविषयी मी सांगतो शासनाच्या प्लॉटवर, महापालिकेच्या प्लॉटवर रोडवाईडीग मध्ये येणा-या प्लॉटवर  अशा बांधकामांना आमचा अजीबात विरोध नाही. परंतु एक, दोन, पाच गुंठयाच्या आतमध्ये राहत घर ज्यांनी स्वत:साठी गावाकडच सगळ विकून घर बांधलेले आहे आपल्या आयुष्यभराची पुंजी त्यांनी त्या घरासाठी लावलेली आहे अशा घराना आम्ही वाचवण्यासाठी आम्ही भांडतोय. यासाठी अनेक कमीटया नेमलेल्या आहेत मा.मुख्यमंत्री, नेते याठिकाणी सांगून गेले. पण त्यातून काहीही निष्पन्न झालेले नाही.  साहेब आपल मी अभीनंदन करतो आपण त्या कमिटीमध्ये आहात लोकांच्या भावना आम्ही आपल्याला सांगण्याचा प्रयत्न करत आहोत. एक नगरसेवक म्हणून नागरीकांच्या भावना याठिकाणी व्यक्त करतो. साहेब गोरगरीबांच घर हे वाचल पाहिजे मग ते कस वाचवायच, कुठल्या पध्दतीन करायच, कुठल्या नियमात बसवायच हे काम आपल आहे. हे कायदयाच्या चौकटीमध्ये बसवून करण्याचा प्रयत्न आपण १०० टक्के करावा अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करतो. साहेब, परस्थिती खुप गंभीर आहे लोक आम्हांला ऑफीसमध्ये बसू देत नाहीत, घरी बसू देत नाहीत ज्याला नोटिस् आली तो रडत घरी येतो. त्यांचे आश्रू आम्हांला पाहावत नाही अशी गंभीर परस्थिती आहे. या कमिटीच्या माध्यमातून आपण लवकरात लवकर चांगला निर्णय्  घ्यावा वाईट निर्णयाची आपल्याकडून अपेक्षाच नाही, आपल्याकडून अपेक्षा खुपच चांगली आहे. जास्तीत जास्त घर रस्ता, रोडवाईडींग, आरक्षण, रेडलाईन  यामधली सोडून आपण चांगला निर्णय घ्यावा.  दुसर सांगायच म्हणजे आपल्या बांधकामाच्या अटी क्लीष्ट आहेत त्यामध्ये आपण बदल करणार का नाहीत. अनधिकृत बांधकाम होण्यास सर्वस्वी आपणच जवाबदार आहोत. कायदे सुटसूटीत असते तर हे अनधिकृत बांधकाम कशाला झाले असत. आम्हांला एक गुंठयाच बांधकाम करायच म्हणल तर आम्हांला फी परवडत नाही, आम्हांला चांगल्या बिल्डरकडे जायला परवडत नाही. नागरीकांना अस वाटत की स्वत:च्या जागेमध्ये एखाद पत्राशेड असलतरी समाधान वाटत,की मी माझ्या जागेमध्ये राहतो. मी माझ्या आयुष्यात

अन्न, वस्त्र, निवारा केला याच त्या नागरीकांना समाधान वाटते. आपल्या कायदयामध्ये एक, दोन, तीन, चार, पाच गुंठयाला फक्त् राहत्या घरासाठी कोणा बिल्डरसाठी मी बोलत नाही जे सर्व सामान्य नागरीक जर स्वत:साठी घर बांधत असेलतर, त्याची जागा असेलतर त्या जागेमध्ये त्याला परमीशन द्या. त्याला कुठतरी बसवा. त्याला एक गुंठयाच बांधकाम करायच असेलतर अख्या सर्व्हे नंबरची मोजणी करायला लावतो. आख्या सात बाराचा नकाशा करायला लावतो. मोजणी केल्यानंतर आपल्याला माहिती येथील कोणकोणत्या टेबलावर त्या फाईलला किती दिवस लागतात. माझ घर बांधायच असेलतर नातेवाईकांकडून पैसे जमा करतो लाख दोन लाख आणतो त्यातून ते घर बांधतो. मी तुम्हांला एवढच सांगतो की आपण या कायदयामध्ये बदल केला पाहिजे. कारण आपण त्या कमिटीमध्ये आहात. आणि शास्तीकर आमच्याकडून कुठल्याही प्रकारे भरला जाणार नाही असे मी जाहीरपणे सभागृहामध्ये सांगतो. आणि कोणी सक्ती केलीतर त्यातून जे काही चांगले किंवा वाईट घडलेतर त्याला सर्वस्वी जबाबदार महापालिका आणि आयुक्त असतील असे सांगतो. शास्तीकराच्या नोटिसा देण ताबडतोब थांबवाव. या नोटीसा ९७-९८, ९८-९९, ९९-२०००, पुर्वीच्या लोकांना त्यांच्या कशा पध्दतीने वाटल्या जातात याच्यावर कुठल्याही मिळकतीच नाव, नंबर नाही अशा नोटीसा वाटल्या जातात. या विषयावर आपण गांभीर्याने लक्ष घालावे व सर्वसामान्य नागरीकांना योग्य तो न्याय दयावा. अशी मी आपल्याला सभागृहाच्या वतीने कळकळीची आणि अग्रहाची विनंती करतो आणि थांबतो.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब मला आपल्याला एक प्रश्न विचारायचा आहे हे ६६ हजार बांधकामाच्या बाबत कोर्टने आदेश दिला आहे त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणार आयुक्त साहेब आपण पाहीलयं का या ६६ हजार बांधकामांमध्ये कुठल्या प्रकारच्या मिळकती आहेत. मी एक उदाहरण देतो माझ्या प्रभाग क्र. ६३ मध्ये १५०० ते १८०० सदनीका आहेत आपल्या करसंकलन विभागाकडून कशा पध्दतीने सर्व्हे झाला ते आपण आवश्यक बघा. तेथील अधिकृत बिल्डींग मधील १००० लोकांना ही अनधिकृत बिल्डींग पाडणार म्हणून नोटीस दिली आहे. याच कारण काय या लोकांना वरुन वरिष्ठ अधिका-याकडून दट्टया येतो तुम्ही लवकरात लवकर सर्व्हे करा आम्हांला कोर्टात माहीती दयायची आहे. त्यामुळे या लोकांनी काय केलेले आहे बिल्डींगच्याखाली थांबायच वरती नजर टाकायची आणि ऑफीसमध्ये जाऊन, समजा खालचा ग्राउंडचा एक फ्लॅट ६५० स्क्वे. फु. चा आहे असेच वर पर्यंत फ्लॅट आहेत असे समजून प्रत्येक विंगला यांनी नोटीसा दिलेल्या आहेत. महापालिकेकडून डेव्हलपमेंट चार्जेस् भरुन एखादया बिल्डरने इमारत बांधली असेल आणि त्यामध्ये कोणी अधिकृत सदनिका घेतली त्याला जर पाडून टाकणार म्हणून नोटीस आलीतर साहेब, जे लोक अनाधिकृत बांधतात ते काय चुकीच करतात हो. एकतर महागामध्ये सदनिका घ्यायची त्या अधिकृत बिल्डींग मधील सदनिकाधारकांना जर नोटिस् देत असाल तुमची बिल्डींग अनाधिकृत आहे म्हणून. त्यांच्याकडे बांधकाम चालू करण्याचा परवाना असतो, बांधकाम पुर्णत्वाचा सुध्दा परवाना आहे, डेव्हलपमेंट चार्ज भरल्याची पावती आहे, प्लॅन पास झाल्याची कॉपी आहे, बांधकाम पुर्णत्वाचा परवाना आहे. तरी सुध्दा या नोटीसा कोणी दिल्या आणि का दिल्या. साहेब, हा ६६ हजाराचा आकडा आणखीन कमी होणार आहे आपण यामध्ये लक्ष् घालाव. कोर्टामध्ये काय उत्तर दयायच या

सगळया गोष्टी व्हेरीफाय झाल्या पाहिजेत यातून बरेच लोक वगळणार आहेत त्यांच्यावर अन्याय होतो कृपया यामध्ये आपण लक्ष घालाव.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा पदनिर्मितीचा विषय दिलेला आहे ही जी पद आहेत ती कोणकोणती पदे आहेत ते सांगावे आणि हे जे १५० पद निर्माण करतो ती फक्त बेकायदेशीर जी बांधकाम आहेत ती पाडण्यासाठी आहेत का आणखीन त्यांच काही काम आहेत. साहेब, शंका आम्हांला अशी आहे की, रेखांकनातील २००२ व २००३ ला आपण गुंठेवारी केली आणि ती गुंठेवारी करत असताना खुप चुकिची झाली आहे. मी आज माझ्याकडच्या जे.ई ना सांगीतल आज ते आले होते. साईडमार्जीन मध्ये जे काही पत्राशेड टाकले, दुकान सुरु केली त्याठिकाणी गुंठेवारी २००२ ला झाली आहे माझ्याकडे एक भाग आहे स.नं. १६५ तो खुप मोठा आहे. त्याठिकाणी हजारोनी घर आहेत ते सर्व प्लॉट रेखांकनामधील आहेत. साहेब अत्यंत महत्वाच आहे मी दोन वर्षे या गोष्टीचा पाठपुरावा करते जागामालकाने प्लॉट विकताना रेखांकनामधील प्लॉट आहेत, लेआऊट मंजूर आहेत इथपर्यंत ते दाखवलेले आहे आणि जागा विकताना त्यांनी एक मास्टर प्लॉन दाखवला होता. त्यानुसार लोकांनी ते प्लॉट घेतले. एखादा पुर्ण प्लॉट तीन गुंठयाचा एखादा कामगार नाही घेवू शकला तर तो प्लॉट दोघा तीघामध्ये पाच जणानी मिळून घेतले आणि त्याठिकाणी घर बांधलेले आहेत. २००२ च्या अगोदरची घरे बांधलेली आहेत २००२-२००३ ला गुंठेवारीसाठी अर्ज केला काही लोकांची गुंठेवारी झाली आणि काही लोकांच्या अर्जावर रेखांकनातील प्लॉट असल्यामुळे तुमच्या प्लॉटची गुंठेवारी होत नाही अशाप्रकारे त्यांना लेखी पत्र गेले. आणि त्याच लोकांना आज अनधिकृत म्हणून पत्र आलेले आहेत की तुम्ही ते पाडा पण तत्पुर्वी आज लोकांचे सगळीकडूनच अच्छे दिन अच्छे दिन म्हणता म्हणता बुरे दिनतर यायला लागलेलेच आहेत सगळीकडचे टॅक्स वाढू लागलेले आहेत. आणि शास्तीकरतर इतका आहे साहेब की लोकाना जगण मुश्कील झाले आहे. मला एवढच कळत साहेब, " सरडयाची धाव कुंपना पर्यंतच " असते अशी आमची परस्थिती आहे. आमच्याकडे एवढ बहुमत आहे साहेब आम्ही घराच्या बाहेरही पडत नाहीत नुसती एक सुध्दा हाक देत नाही की, चलारे म्हणून. आम्हांला त्याची आवश्यकताही वाटत नाही. आमचे पदाधिकारी आहेत आम्ही त्यांच्या मागे आहोत. इथेच आम्ही बोलतो. साहेब आम्ही " साप साप म्हणून भूई धोंपडतो " शासन आमचंच आहे. त्यामुळे धन्य ते शासन, आणि आम्ही पण निवडून आलेलो धन्य की ज्यांनी अशाप्रकारे लोकांच्यावर एवढ ओझ लादलेल आहे. बीचारी मुकी प्रजा खरंच काही करु शकत नाही. त्यात याच्यावर राजकारण केल जातय कोणी निवडून येतंय कोणी पडतंय आम्ही काहीच करत नाहीत. माझी जी व्यथा आहे ती माझ्या वॉर्डातील व्यथा आहे ती तुम्हाला मी सांगीतली आहे. साहेब रेखांकनामधील प्लॉटलातरी तुम्ही गुगलवर बघावे ते घर कधीची आहेत काय आहेत त्यांच्याकडे जे २००६ ला आणि २००७ ला बांधकाम करत होते त्यावेळेसचे पुरावे आहेत. काही खडी, वाळू त्यांनी रस्त्यावर टाकली त्याचा दंड महापालिकेनी घेतलेला आहे त्याचे पुरावे आहेत. चुकिच्या ज्या नोटीसा आलेल्या आहेत त्या बाबत काही लोकांनी अर्ज केलेले आहेत. त्या अर्जाचा आपण त्वरीत विचार करावा. १९८१ मध्ये बांधलेलं घर आहेत वरती सिमेंटचा पत्रा आहे, अत्यंत दारिद्रय घरामध्ये आहे आणि त्या माणसाला शास्तीची नोटीस आलेली आहे, अनधिकृतची नोटीस आलेली आहे. बाल्कनीमध्ये

पाऊसाच्या पाण्यासाठी दोन फुटाचे पत्रे पुढे टाकलेले आहेत त्याना अचानक अनधिकृतची नोटीस आलेली आहे. तरी हा विचार आपण केलातर बरेचसे लोक त्यातून वाचू शकतील दहा वीस प्रत्येक वॉर्डातील वाचलेतरी ते आमचा विचार करतील की आम्ही काहीतरी  काम करतोयं. याठिकाणी मला आयुक्त साहेबांना सांगायच आहे आपण ही जी पदनिर्मिती केली आहे त्याचे मला स्पष्टीकरण पाहिजे त्यांच नेमक काय काम आहे. रेखांकन मधील बांधकाम कितपत त्यांना रेग्युलराईज करता येईल काय ते ही काम त्यामध्ये असेल नां साहेब. तरी मला त्या कामाच स्पष्टीकरण द्याव मग बोलाव. मी परत एकदा सांगते आपण याठिकाणी आल्या पासून आम्हांला थोडासा दिलासा मिळालेला आहे. तरी आपण सहानुभूतीपुर्वक्  विचार करावा व जेवढ शक्य् आहे तेवढ आम्ही सांगू शकतो दुसर काही आम्ही करुच शकत नाहीत.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज याठिकाणी अनाधिकृत बांधकाम पाडण्यासाठी पदनिर्मितीचा ठराव आपण मांडता म्हणजे आमच्या हातून मोठ पाप आपण करुन घेताय. आता दत्ताकाका साने यांनी अत्यंत तळमळीने विषय मांडलेला आहे.  त्याच कारण त्यांच्या वॉर्ड मध्ये सर्वात् जास्त नोटीस आलेल्या आहेत. सर्वात् जास्त शास्तीकराच्या कारवाया दंडात्मक कारवाया  त्याठिकाणी चिखली आणि मोरेवस्ती परिसरामध्ये झालेल्या आहेत. संपुर्ण शहरामध्ये आपण ६६ हजार बांधकामाचा उल्लेख कोर्टामध्ये करतोय पण त्या व्यतीरीक्त पावणेदोन लाख बांधकाम अनधिकृत आहेत की जी आपल्या रेकॉर्डवरती आहेत आणि त्या सगळयांना आपण शास्तीकर लागू केलेला आहे. बाईनी आताच सांगीतले अच्छे दिन म्हणता म्हणता बुरे दिन यायला लागले त्यांच्या भावना आम्ही समजू शकतो त्या गोष्टीवर आम्ही कॉमेन्ट न करता त्यांची जी भावना आहे, स्वत:च्या पक्षा विरुध्द बोलण्याच धाडस हे नगरसेवक करतात कारण ती वेळ त्यांच्यावर आलेली आहे. कारण अनधिकृत बांधकामामध्ये राहणा-या नागरीकांची मते आपल्याला चालतात ते मते घेवून आपण निवडून येतात आणि तेच नगरसेवक ज्यावेळेस आम्ही त्यांच घर पाडण्यासाठी पुढे जातो तेव्हा मा.आयुक्त सांगतात की आपल्यावर कायदेशीर कार्यवाही होईल, आपल नगरसेवकपद  रदद् होईल. मी आज याठिकाणी सांगू इच्छिते या सभागृहात १२८ नगरसेवकांना राहण्याचा अधिकार राहत नाही  कारण ज्या ज्या भागामध्ये अनाधिकृत बांधकामाची मत ज्यांनी घेतली आहे त्यांनी या पदावर राहू पण नये. महापौर साहेब, आपल सभागृह सर्वोच्च म्हणलं जात याठिकाणी शास्तीकराचा प्रस्ताव दोनवेळेस शासनाकडे पाठविला आहे. सदस्यांच म्हणण आहे की तो शास्तीकर अन्यायकारक आहे. दंडात्मक कार्यवाही ही कधी व्हायला पाहिजे  परंतु दोनदा शासनाने तो फेटाळलेला आहे शासनाने तीकडे फेटाळला की इकडे कार्यवाही लगेच सुरु होते आपण लोकांची दिशाभूल करतो शासनाकडे विषय  मंजूर करुन घेण्याची जबाबदारी कोणाची आहे. आज शासन तुमच आहे. जर त्यांनी तीकडे विषय सोडविला नाहीतर आपण कसाकाय विषय पाठवायचा. परत लोकांची दिशाभूल करायची. आम्ही म्हणतो शास्तीकर भरायचा नाही परंतु आपण त्याच्यावरती व्याज लावून पुन्हा पुन्हा नोटीस पाठवितो. लोकांची परस्थीती अशी झाली आहे की “ आई जेऊ घालीत नाही आणि बाप भीक मागू देत नाही ” एवढी दयनीय अवस्था आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये नागरीकांची झालेली आहे. राजकारणाचा भाग त्यामध्ये अनावर्नीय येतो. लोकांना न्याय मिळावा म्हणून लोक सत्ताधारी पक्षाकडे, विरोधकांकडे जातात  आणि म्हणतात की

आम्हांला न्याय द्यावा अशा याचना करतात आणि आपल्याला वाटते की आम्ही राजकारण करतो परंतु तस अजीबात नाही. महापौर साहेब, आपण पिठासीन अधिकारी म्हणून आज याठिकाणी काही गोष्टी जाहीर केल्या पाहीजेत शास्तीकर घेवू नये म्हणून आज या सभागृहात मागणी होते जी आपण पिठासीन अधिकारी म्हणून याठिकाणी जाहीर कराव. नवीन गाव आपल्याकडे आले तेथील मिळकतकरामध्ये माफी मिळावी म्हणून सर्वांनी आंदोलन केले. आयुक्त साहेब त्या गावामधील १० वर्षाचा मिळकतकर नंतर माफ झाला परंतु तो कोणाचा माफ झाला, ज्या लोकांनी एक रुपयाही मिळकतकर भरला नाही दहा वर्षात एकदाही महापालिकेकडे आले नाही, ज्यांनी आजीबात मिळकतकर भरला नाही आशा २० टक्के लोकांना मिळकतकर माफ केला. परंतु प्रामाणीक ८० टक्के करदाते जे आहेत त्यांनी तूमच्या जप्तीच्या नोटीसाला घाबरुन, कुठेतरी आपली इज्जत जाईल, आपल्या घराला नोटीस चिटकून जातील याला घाबरुन त्या करदात्या नागरीकांनी प्रामाणीकपणे कर भरला त्या नागरीकांना एक रुपया सुध्दा सवलत मिळाली नाही. उदया निवडणूका तोंडावर आलेल्या आहेत कदाचित शास्तीकराची माफी येवू शकते अशावेळी ज्यांनी शास्तीकर भरला त्यांना परत देणार का? नाही देणार. आपण पिठासीन अधिकारी म्हणून जाहीर करावे की जोपर्यंत शासनाचा निर्णय येत नाही तोपर्यंत शास्तीकर कोणीही भरु नये. अनाधिकृत बांधकामाच्या बाबतीत, शास्तीकराच्या बाबतीत नागरीकृती समितीने मोर्चा आणला होता. लोकांना समजत नाही की काय कराव. एक-एक लाख शास्तीकर आलेला आहे. भाडयाच्या घरात राहीलतर ते परवडेल अशी त्यांची परस्थिती झालेली आहे अनधिकृत बांधकामाचा २.५ एफएसआयचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबीत आहे. म्हणजे प्रस्ताव प्रलंबीत आहे अशावेळेस तुम्ही त्याना अनधिकृत म्हणून घोषणा करुन त्यांचेवर शास्तीकर लावून पुन्हा तुम्ही कार्यवाही करता आज रुपीनगर, तळवडेच्या भागामध्ये चार हजार नागरीकांची संख्या आहे. देहू कॅण्टोन्मेंट हददीमध्ये जनगणना झाली, देहूरोड कॅण्टोन्मेंटचे लोक आलेले होते त्यांनी नवीन येणा-या निवडणूकीसाठी त्यांचे तीकडचे मतदार म्हणून नोंदणी सुरु केलेली आहे. ती लोकसंख्या चार हजार आहे मग ते लोक नक्की कोणाच्या हददीमध्ये आहेत मग त्यांनी येथून पुढचे मतदान कोणाच्या देहूरोड कॅण्टोन्मेंटच्या हददीमध्ये करायचं, त्यांना नागरी सुवीधा कोण पुरवणार म्हणजे आपली आपल्या नागरीकाकडे अजीबात क्षमा नाहीयं. देहूरोड कॅण्टोन्मैंट लोकांची नोंदणी करतयं. इकडे लोकांना शास्तीकराची भीती आहे आपल्याकडे सहकार्य होत नाही. जबाबदार व्यक्ती कडून उत्तर हवे. आपण कुठलीही त्यांना शाश्वती देवू शकत नाही आपण फक्त विरोध नोंदवू शकतो. आज आम्ही प्रतीकात्मक निषेध म्हणून या टोप्या घातलेल्या आहेत. या टोप्या काही आम्ही फोटो काढण्यासाठी घातलेल्या नाहीत आम्हांला दाखवायच आहे की आम्ही प्रयत्न करतो आणि सन्मा. महापौर सुध्दा याठिकाणी आमच्या प्रयत्नाना दुजोरा देणार आहेत कारण पिठासिन अधिकारी म्हणून त्यांची ही नैतीक जबाबदारी आहे असे मला वाटते. मा.आयुक्त साहेब, आपण नवीन आहात अशी परस्थिती झाली की पहिल्या आयुक्तांची आठवण आली की अंगावर शाहरे येतात. आपण चांगले आहात परंतु आपल्याकडे मराठीमध्ये एक म्हण आहे “ ऊस गोड लागला की मुळा पासून खाण्याची सवय ” तुम्ही सावध रहा लोक तुम्हांला मुळापासून खाण्याचा प्रयत्न करतील. या शहरात बिल्डरची जी बांधकामे चालतात त्यांना मोठे अभय आहे. अनेक ठिकाणी नाले बुजविले गेले आहेत जर विकास आराखडा नकाशातील नाले बुजवीलेतर ते अनधिकृत होत

नाहीत कारण ते आपल्या संहमतीने होतात. कजरी शॉप झालेले आहे ती कमर्शीअल बिल्डींग आहे त्याच्या खालचा नाला बघावा कुठे गेलेला आहे. मी आपल्याला पत्र देणार आहे जेवढे नाले आहेत त्यांची दिशा का बदलली आहे ते का बुजविले. आपण एका ठिकाणी सामान्य नागरीकांवर कार्यवाही करतो त्यांना काही बोलण्याची आपण संधी देत नाहीत परंतु बिल्डरांना आपण हरकतीला बोलवतो, त्यांच म्हणण ऐकूण घेतो, त्यांना कोर्टात जाण्याची संधी प्राप्त करुन देतो त्यांचे बांधकाम तसेच चालू राहते. आपण या सर्व गोष्टीवर अनधिकृत बांधकाम व शास्तीकरावर ताबडतोब निर्णय घ्यावा. मा.महापौर साहेब, शास्तीकराच्या बाबतीत आपण आजच निर्णय जाहीर करा काय होईल ते होईल आपल महापौर पद आता संपलेल आहे काही घाबरण्याच कारण नाही तुम्हांला आता पुढच्या मैदानात जायच आहे आणि हे मी सांगते म्हणून विचार करा नागरीकांच्या हितासाठी आपल्याला एकत्र राहून काम करणं गरजेच आहे आणि नागरीकांनीही या गोष्टीचा विचार करुन कोणीही शास्तीकर भरु नये. धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे –** मा.महापौर साहेब, खरंतर महापालिका सभा ही सर्वात श्रेष्ठ सभा असे मानले जाते. सामान्य जणतेचा कर घेवून आपण आपली महापालिका चालवतो आणि अशा लोकांचे घर पाडण्यासाठी आपण मनुष्यबळ घेतो त्यासाठी हा विषय आपल्याकडे येतो याच्या पेक्षा वेगळी शोकांतीका नाही. खरंतर स्थायी समितीला असताना आपल्याकडे आरोग्य अधिकारी कमी आहेत, हे कमी आहे ते कमी आहे असे अनेक विषय सभागृहात मांडण्याचा प्रयत्न केला त्या विषयाचा प्रस्ताव विषय महापालिका सभेसमोर आलेला नाही कोणत तोंड घेवून आम्ही लोकांसमोर जायचं काय म्हणून जायच की आज आमच्या सभागृहामध्ये विषय काय आला की तुमचा कर पै पै घेवून तुमचे गळे कापतो, खीसे कापतो आणि कर गोळा करतो व तुमच्या लोकांची घर पाडण्यासाठी अधिका-यांची नेमणुक करायची त्यांचा पगार द्यायचा म्हणून. सन्मा.आयुक्त साहेब अत्यंत वाईट गोष्ट म्हणजे तुम्ही लोकांना सांगतात की आपण अनाधिकृत बांधकाम केल हे करायला नागरीक एकटेच जबाबदार आहेत का. ज्यावेळेला तुम्ही कोर्टा समोर उच्च न्यायालयासमोर विषय मांडता, ज्यावेळेला तुम्ही त्या व्यक्तीच घर पाडता त्या ठिकाणी असलेल्या अधिका-यांची सुध्दा तेवढीच जबाबदारी आहे. अस झालतर ज्या अधिका-याच्या काळात हे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्या अधिका-यांना आपण नोटीस दिलेल्या आहेत का? एखाद पत्र दिलेल आहे का? की हे तुझ्या काळातील बांधकाम आहे त्यामुळे आपण जबाबदार आहे तूझ्या पेमेंटमधील एवढे पैसे कापून घेतले जातील असे पत्र संबंधीत अधिका-याना दिले आहे का? त्या गरीबाने पै पै करुन जागा घेतली घर बांधायचे अक्षरशा काही काही लोक आमच्याकडे आले ताई शेवटी नौकरीतून रीटायर होताना आम्हांला हे दहा लाख रुपये, पाच लाख रुपये फडांचे मिळाले आहेत ते सर्व घेवून मी घर बांधल असे सांगतात. एखादी जागा त्या गरीबांनी घेतलेली असते ती जागा ग्रीन झोनमध्ये आहे का कशी आहे हे त्यांना माहीत नसते. कधी आपण जनजागृती केली का आपल्याकडे लोक बिल्डींग परमीशनला येतात, बिल्डर येतात आपण जाहीर केल का अशा अशा बिल्डींगा अनधिकृत आहेत तुम्ही त्या ठिकाणी घरे घेवू नये, अमुक जागा अनधिकृत आहे ती तुम्ही घेवू नये असे काही जाहीर केल का? आणि लोकांची घर पाडण्यासाठी हा विषय आणला इतका फालतू विषय आज सभागृहामध्ये आणला आहे याच्यावर चर्चा करुन सुध्दा दुःख आहे. परवा दिवशी पिंपरी

चिंचवड शहरामध्ये लोकांना नोटीस वाटल्या त्यावेळेला म्हणजे धक्कादायक गोष्ट अशी की २००५ चे कम्प्लेशनचे पत्र आहे त्या बिल्डींग मधील सहाही फलॅटला आपण अनाधिकृत बांधकाम आहे आपण ते एक महीन्याच्या आत खाली कराव म्हणून नोटीस पाठवीली आहे. आता त्यात एखादा पेशंट असला त्याला अटॅक आला आणि तो गेलातर आपण काय करणार. त्यावेळेला कोणाला दोषी धरणार. त्या वेळेला मी अधिका-यांना संपर्क साधला विचारले असे का झाले म्हणूनतर ते सांगतात ताई तूमच लेटर दाखवा, तुम्ही अर्ज करा. म्हणजे यांनी चुका करायच्या आणि नागरीकांनी भोगायच्या. त्यांनी त्या अर्जाला चार झेरॉक्स जोडायच्या आणि तुमच्या ऑफीसमध्ये येवून तुमच्या साहेबांची वेळ घ्यायची त्यांच्याकडे येवून तो अर्ज द्यायचा हा कोणता न्याय आहे. कोणत्या दिशेन आपण वाटचाल करतो. लोकांनी बील भरले नाहीतर, शास्तीकर भरला नाहीतर त्यांना १२ टक्के व्याज लावतो, आणि त्यांना पुढच्या महीन्यात दंडात्मक कार्यवाहीचे पत्र पाठवितो. माझ्या कासारवाडी प्रभागामध्ये सुध्दा किमान १५० ते २०० नोटीस चुकीच्या आलेल्या आहेत. अधिकारी सांगतात मॅडम ते करसंकलनने चुकीचे पत्र दिले आणि करसंकलनवाले सांगतात बांधकाम विभागाने असे पत्र दिले. तुमच्या तूमच्या मध्येच समन्वय नाहीतर नागरीकांकडून कशी अपेक्षा करता. महापौर साहेब, आपण जाहीर करावे की कोणीही नागरीकांनी शास्तीकर भरु नये म्हणून, व ज्या चुकीच्या नोटीसा आलेल्या आहेत त्या आयुक्तांकडे द्याव्यात आणि हा शास्तीकर रदद करावा व लोकांना आवाहन करावे जे व्हायच ते पुढच्या पुढे बघता येईल. आयुक्त साहेब आपण सुध्दा त्या त्या वेळेसचे जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांना जबाबदार धरता येईल का याचा विचार करावा आणि त्यांच्यावर सुध्दा फौजदारी केस दाखल केली पाहीजे. हे सगळ बाजूला राहील आणि ज्यांच ख-या अर्थाने अज्ञान आहे अशा लोकांना कठडयामध्ये उभ करतोय, धन्यवाद.

**मा.आर.एस.कुमार –** मा.महापौर साहेब, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे पदनिर्मिती करण्याचा ठराव आहे त्यावर जास्त बोलण उचीत नाही. चार पाच महिन्यापुर्वी प्राधिकरण कार्यालयाचे उदघाटन करताना मा.मुख्यमंत्री यांनी सांगीतल अनाधिकृत बांधकामाबददल आठ दिवसात जी.आर. काढू, त्या दिवसा पासून लोक आमच्याकडे येतात. कधी होणार, कधी जीआर निघणार त्यावेळेला अनाधिकृत बांधकाम अधिकृत केले असतेतर शास्तीकराचा व हे पाडण्याचा प्रश्न आला नसता. आपण लोकांच्या कल्याणासाठी काम करतो, लोकांसाठी काम करतो याचा विचार केला पाहीजे. लोकांच्या फेवरमध्ये आपण काम केले पाहीजेत. शासनाने चुक केली, नेते मंडळीने सांगीतल्या प्रमाणे केल नाही. आता हा शास्तीकर बघा १०० रुपये टॅक्स असेलतर शास्तीकरा प्रमाणे त्या नागरीकास ३०० रुपये भरावे लागतात. ज्यांना १० हजार टॅक्स आहे त्यांना ३० हजार भरावे लागतात. ब्रिटीशांच्या जमान्यामध्ये सुध्दा असे टॅक्स नव्हते. आज आशाप्रकारचे टॅक्स लावून शासन काय सिध्द करतयं. मी विनंती करतो की नेत्यांनी आतातरी डोळे उघडावेत. आपण लोकांसाठी काम केले पाहीजेत हे त्यांना कळत नाही का. अनाधकृित बांधकाम २० ते २५ वर्षा पासून झाले त्यावेळेला कोणीही ऍक्शन घेतली नाही. लोकांनी ते का बांधले त्यांना परवडणारी कोठेही घरे नाही म्हणून त्यांनी एक गुंठा, अर्धा गुंठा जागा घेवून घर बांधलेली आहेत त्यांना टॅक्स लावतो आणि परत ते बांधकाम आपण पाडतो. आपल्या येथील वंजारी व डांगे हे कोर्टात गेले. डांगेच्या केसमध्येतर कॉर्पोरेशनने अनधिकृत बांधकाम

६६ हजार झाले असे ॲफीडेव्हीट तुम्ही स्वत:हून कोर्टास दिलेले आहे. महापौरांनी नेते मंडळीना विनंती करावी की शास्तीकर त्वरीत रदद व्हायला पाहीजे नाहीतर एक महीन्यानी लोक माफ करणार नाहीत. लोकसभेमध्ये जसे झाले तसे विधानसभेला होणार आहे.

**मा.निता पाडाळे –** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब माझा असा प्रश्न आहे की अनधिकृत बांधकामाला शास्तीकराच्या नोटीसा दिलेल्या आहेत त्या नोटीसा ३० ते ३५ वर्षा पुर्वी झालेल्या घरानां दिलेल्या आहेत. काही काही घर ग्रामपंचायत हददी मधील आहेत. माझ्या शेजारी गावठाणामधली सुध्दा घर आहेत त्यांना सुध्दा आपल्याकडून नोटीस मिळालेली आहे. ग्रामपंचायतीमध्ये नोंदी असतीलतर त्यांनी महापालिकेकडून कशा काय परवानग्या घ्यायला पाहीजे होत्या. हे कुठतरी आपल चुकतयं लोक अक्षरश: रडतात. लोक म्हणतात ताई आमच ग्रामपंचायतीच्या काळातल बांधकाम आहे त्यांचे बांधकाम जसे आहेत तसेच आहे सीमेंट, पत्रा, कौलारुचे बांधकाम आहेत तरी सुध्दा त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. काही काही लोकांना शास्तीकर तीन पट दिलेला आहे. एका माणसाचे महीन्याला उत्पन्न पाच ते सहा हजार असेलतर तो ३० हजार शास्तीकर कसा भरणार याचा विचार केला पाहीजे. ज्या नोटीसा दिलेल्या आहेत त्याचा विचार करावा. परत आपण खात्री करावी खुप चुकीच्या पध्दतीने नोटीसा दिलेल्या आहेत. लोक ओरडतात काही लोकांची गुंठेवारी आहे, अधिकृत अस बांधकाम त्यांच्या उता-यावर आहे त्यांना सुध्दा नोटीस दिलेली आहे. महापौर साहेब, आपण यामध्ये लक्ष घालून हा शास्तीकर रदद करावा.

**मा.शारदा बाबर –** मा.महापौर साहेब, आता शास्तीकर या विषयावर सर्वांचे बोलणे झालेले आहे मला जास्त बोलायचे नाही परंतु खरंच आपले सर्व राजकीय लोक शास्तीकराला धास्तावलेले आहेत का? का येणा-या निवडणूकीला धास्तावले हेच मला समजत नाही. सर्वसामान्य नागरीकांना हे सरकार आल्यानंतर सर्व स्वस्त होईल असे वाटत होते परंतु महागाईने लोक त्रस्त झालेले आहेत त्यात आणखीन शास्तीकर. त्यामुळे मला असे वाटते की खरच राजकीय लोकांना शास्तीची धास्ती घेतलेली आहे का? का येणा-या निवडणूकीची धास्ती घेतली. अनाधिकृत बांधकामासाठी जे पद भरती करायचे आहेत त्यांचे पगार लोकांच्या करातून करणार का हा सुध्दा खुलासा झाला पाहीजे. लोकांच्या करातून करणार असालतर त्यांचे बांधकाम पाडून त्यांचेवरच सुरी मारायची असे होईल. शास्तीकर व महागाईमुळे शेतकरीच नाहीतर सर्वसामान्य नागरीकास आत्महात्या करण्याची वेळ आलेली आहे तरी महापौरांनी यावर जास्तीत जास्त लक्ष देवून असा शास्तीकर रद्द करावा ही विनंती.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, हा विषय जीवन मरणाचा विषय आहे. सर्वसामान्य नागरीकांच्या मानेवर टांगती तलवार आहे. शास्तीकर, अनधिकृत बांधकाम, एमआयडीसी, रेडझोन या सर्व विषयाला नागरीकांना सामोरे जावे लागते. सर्वसामान्य नागरीकांना शास्तीकर भरण्यासाठी नोटीस गेलेल्या आहेत ते धास्तावलेले आहेत. हे आताच सांगीतले आहे. हा सर्वसामान्य नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. ज्यांचेवर ही वेळ आलेली आहे तो हा सर्वसामान्य नागरीक कामाच्या निमित्तानं आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेरुन

याठिकाणी आलेला आहे त्यांनी अर्धा, एक गुंठा जागा घेतलेली आहे त्याठिकाणी त्यांनी कर्ज काढून हे बांधकाम केलेले आहे. माझ्या थेरगावच्या प्राधिकरण ऐरीयामध्ये बँकेच लोन सुध्दा काढता येत नाही लोकांनी अशा परस्थितीत बांधकाम केलेले आहे. ज्या लोकांनी बांधकाम केलेले आहे त्यांचेवर भीतीचे वातावरण आहे. त्यांनी कर्ज काढून, सोनं मोडून बांधकाम केलेले आहे ते घर आपण पाडणार आहोत. आपल्या नोटीसा आल्या त्यावेळेला माझ्या भागातील एका माणसाला अटॅक आला त्यांनी गावाकडचं सगळ मोडून याठिकाणी दोन मजले घर बांधल आणि त्याच्या मुलाचे लग्न दोन दिवसावर आले आणि त्यांना नोटीस आलेली बघीतलीतर त्याला अटॅक येवून तो खाली कोसळला. अशावेळेस त्यांची जी काही झीज झाली ती आपण भरुन देणार आहेत का? आपण पदनिर्मिती करणार आहोत ती सुध्दा घर पाडण्यासाठी. आपल्या महापालिकेत जे चालले आहे ती जनतेची फसवणूक चालली आहे. जनतेपुढे आलेले हे संकट आहे त्याचे निवारण कसे करणार. गोरगरीबांची घरे वाचली पाहीजेत. शास्तीकर सर्वसामान्य नागरीक भरणार नाहीत. याच्यावर तोडगा काढावा.

**मा.पौर्णिमा सोनवणे –** मा.महापौर साहेब, अतिक्रमण विभागासाठी पदनिर्मितीचा विषय घेतलेला आहे आणि शास्तीकर हा पण विषय आहे. नागरीकांकडून चारपट वसूली करुन या लोकांचे पगार कराल. ही पदनिर्मिती रद्द् करावी आणि शास्तीकर सुध्दा रद्द् करावा. माझ्या प्रभागामध्ये रेडझोन  आहे तेथील बांधकाम अनाधिकृत ठरवलेली आहेत. आता शास्तीकराचा बोजा सामान्य नागरीकांवर टाकलेला आहे तो अन्यायकारक आहे. तरी शास्तीकर रद्द करावा त्यांना आपण मुलभूत सुविधा देत नाहीत. शास्तीकर भरण्यासाठी लोकांना कर्ज काढावे लागणार आहे म्हणजे सामान्य नागरीक यामध्ये भरडला जाणार आहे तरी मा.महापौरांनी यामध्ये लक्ष घालून हा शास्तीकर रद्द करावा.

**मा.संपत पवार-** मा.महापौर साहेब, आमचा प्रभाग पुर्ण प्राधिकरणामध्ये येतो तीकडून प्राधीकरणाच्या नोटीसा येतात इकडून शास्तीकराच्या नोटीसा येतात. विदर्भात शेतकरी आत्महत्या करतात आता येथे शास्तीकरामुळ आत्महात्या होतील तरी हा शास्तीकर माफ करावा.

**मा.आश्विनी मराठे -** मा.महापौर साहेब, शास्तीकराचे काय करणार म्हणून लोक आमच्या ऑफीसमध्ये येवून आम्हांला विचारतात.  आम्ही सुध्दा त्यांना ठोस असे उत्तर देवू शकत नाहीत. यावर निर्णय व्यवस्थीत व ठाम व्हावा व शास्तीकर रद्द करणेत यावा.  या लोकांचे घर नियमीत होणार का ? इतर महापालिकेमध्ये शास्तीकर आहे असे ऐकलेले नाही मग हा फक्त पिंपरी चिंचवड महापालिकेमध्येच आहे का ? याचाही विचार केला पाहिजे आणि हा शास्तीकर रद्द करावा.

**मा.राहूल जाधव-** मा.महापौर साहेब,आज जो शास्तीकराचा विषय आहे, अनाधिकृत बांधकामाचा विषय आहे. सगळेजण बोलले आहेत, आमच्यासारख्या सदस्यांवर अन्याय झालेला आहे. आज समाविष्ट गावचा विषय घेतला तर या महापालीकेमध्ये १९९७ ला १८ गावाचा समावेश केलेला होता आणि १९८९ च्या घराला नोटीस देता कसला हा भोंगळ कारभार आहे.  आयुक्त साहेब

आपण मिटींग लावताना सर्व सदस्यांना बोलवावे. पाणीपुरवठयाची मिटींग असू दया, स्थापत्यची मिटींग असू दया, किंवा शास्तीकराची असू दया, करसंकलनची असू दया आपले पाणीपुरवठयाचे लोक मीटर सुध्दा पाहत नाहीत दोन दोन लाख बील देतात. पेनाने बील दिलेले आहे. जाधववाडीचा पन्नास नंबरचा पाण्याचा मीटर पेनाने लिहून दिलेला आहे त्याला आजपर्यंत बील येत होत १८० ते २०० रुपये त्याच आज बील आलेल आहे ४४७० रुपये कसला हा कारभार आहे. आज शास्तीकराचा विषय आहे किती शास्तीकर घेता. १८ गावांचा समावेश केल्यानंतर त्यांच्याकडून कररुपाने जेवढे पैसे जमा केले तेवढा त्या गावावर खर्च सुध्दा केलेला नसेल. समाविष्ट गावामध्ये  काय काय केले याचा खुलासा करावा. स्थापत्य विभागाने खुलासा करावा पाणीपुरवठा विभागाने खुलासा करावा की आजपर्यंत कुठे कुठे पाणी पुरविले.  आहे का आम्हांला खेळाचे मैदान, आहे का आम्हांला हॉस्पिटल, आहे का आम्हांला गार्डन. याठिकाणी यायच आणि कुत्र्यासारख भूंकून निघून जायचं. नगरसेवक झाल्यापासून पाण्याचा प्रॉब्लेम, अनधिकृत बांधकामाचा प्रॉब्लेम किरकोळ विषयतर बाजूलाच आहेत, शास्तीकराचा विषय आहे मी विनंती करतो की समाविष्ट गावातील शास्तीकराबाबत सर्व सदस्यांना सांगतो, लोकप्रतिनीधी म्हणून आपण सर्वानी सांगावे हा शास्तीकर भरु नका, काय फाशी देणार का ही महापालिका, आम्ही शास्तीकर भरणार नाहीत. जनतेला अगोदरच अनाधिकृत बांधकामामुळे नको नको झालेले आहे आणि आपण त्याच्यावर शास्तीकर मागतो आहोत. महापौर साहेब, मी एक उदाहरण देतो माझ्याकडे एक सीक्ससीटर रीक्षा होती.  मार्च महीना आला की हे ट्रॅफीकवाले आमच्या गाडया पकडून चौकीला न्यायचे आणि पैसे जमा करायचे आम्ही त्यांना विचारल का बरं तुम्ही असं करता, तर ते म्हणाले मार्च महीना आला की आम्हांला टार्गेट करायचे असते कोर्टाने निर्णय दिला महानगरपालिकेला आणि तुम्ही आमच्यावर का अन्याय करता. तसे हे ९० दिवसाचे टार्गेट कोर्टाने दिले आहे का ?  १९८९ च्या गावाला नोटीसा देता ही गाव १९९७ ला समाविष्ट केलेली आहेत. आमच काही चुकत आहे का. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जो शास्तीकर लादलेला आहे तो रद्द करावा व अनाधिकृत बांधकामांना ज्या नोटीसा देतात त्याची पुर्ण चौकशी करुन नोटीसा द्याव्यात. धन्यवाद.

**मा.नितीन काळजे –** मा.महापौर साहेब, जो शास्तीकराचा विषय चालू आहे तो आपण २००० पुर्वीच्याही घरांना देतो.  मनपामध्ये १९९७ साली आमच्या गावांचा समावेश  झालेला आहे. व १९८९ सालची घर आहेत. पुर्वी ही घर आजोबांनी, पंजोबानी बांधली त्यावेळेला हा एन.ए. नव्हता. काही नव्हते. स्थापत्य विभागाने सर्वाना नोटीस द्यायचे चालू केलेले आहे. सगळी लोक धास्तावलेली आहेत. आम्ही पुर्वीपासून तेथे राहतो.  यांनी जूनं कुठले रेकॉर्ड काढले हे माहीत नाही आम्ही रेकॉर्ड मागीतलेतर आम्हांला मिळत नाही. माझी विनंती आहे की जून्या बांधकामाची वर्गवारी केली पाहीजे व हे नोटीस देणं त्वरीत बंद करावे.

**मा.बाबासाहेब धुमाळ –** मा.महापौर साहेब, मला विचारावयाचे आहे की आपण हा ठराव ठेवलेला आहे आपल्याला कोर्टाचे डायरेक्शन काय आहेत ते कृपया आपण वाचून दाखवावेत. गेल्या वेळेस कोर्टाचे डायरेक्शन वेगळे होते. कोर्टाने विचारलेले नव्हते की तुमच्या कडे अतिक्रमण किती आहेत म्हणून. आपल्याकडील वकील असे आहेत की त्यांना इंग्रजी

वाचण्यासाठी येत नाही. कोर्टाचे डायरेक्शन असे होते की, तुमच्याकडच्या अतिक्रमणाबाबत काय निर्णय घेणार आहेत, कसे करणार आहेत असे विचारले असताना आपण यादीच कोर्टाला देवून टाकलेली आहे. त्यामुळे ख-या अर्थाने अनधिकृत बांधकामाचा प्रश्न वेठीस गेलेला आहे. आपल्याला कोर्टाचे डायरेक्शन कुठल्या प्रकारचे आहेत ते इंग्रजीमधील असतील किंवा मराठीत असतील ते वाचून दाखवावे नंतर ठरावावर विचार करु. कायदा काय आहे ते वाचावे. १५० लोक भरणार आहेत त्यांच्या पगारासाठी प्रोव्हीजन केलेले आहे का ? उदया एलबीटी बंद होणार आहे त्यामुळे आहे त्याच लोकांचा पगार होण मुश्कील होईल व या लोकांना पगार देण्यासाठी पैसे राहणार नाहीत.

**मा.विनया तापकीर –** मा.महापौर साहेब, या विषयाच्या अनुषंगाने चर्चा चाललेली आहे. आमच्याकडे ग्रामपंचायतीच्या काळामधील घरे आहेत त्या घराना आपण कसे काय अनधिकृत ठरविता हे आयुक्तांनी सांगावे. १७ वर्षे झालेले आहे आपण समाविष्ट गावामध्ये मुलभूत सुविधा देवू शकत नाहीत. त्यांचेकडून शास्तीकरच कायतर साधा कर सुध्दा महापालिकेनी घेवू नये असे वाटते. आख्खी गावची गाव उध्दवस्त करायला निघालेला आहात लोक धास्तावलेली आहेत. या शास्तीकराने व अनधिकृत बांधकामाने सर्व लोकांना सळो की पळो करुन सोडलेले आहे. आम्हांला असे वाटायला लागलेले आहे की आम्ही मुघलांच्या काळात जगतोत की काय? महानगरलिका नव्हेतर ग्रामपंचायतच बरी होती असे आम्हांला आणि आमच्या गावातील नागरीकांना वाटू लागलेले आहे. शास्तीकरावर व अनधिकृत बांधकामावर निर्णय घ्यावा नाहीतर नागरीकांच्या वतीने मंत्रालयावर मोर्चा नेण्यास आम्ही मागे पुढे पाहणार नाहीत. ग्रामीण भागावर फारच अन्याय झालेला आहे आपण मुलभूत सुविधा सुध्दा नागरीकांना देवू शकत नाहीततर शास्तीकर कसा लावता. समाविष्ट गावच्या वतीने विनंती आहे की शास्तीकराच्या बाबतीत लवकर निर्णय झाला नाहीतर आपण सर्वानी मुंबईला मोर्चा घेवून जाऊ व त्याठिकाणी आंदोलन करण्यास हरकत नाही असे वाटते.

**मा.आयुक्त –** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. मा.शमीम पठाण यांनी प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सांगतो  एकूण १५५ पदाची निर्मिती करायची आहे. त्यामध्ये कार्यकारी अभियंता २, उपअभियंता १९,  कनिष्ठ अभियंता ६२, बीट निरीक्षक/स्थापत्य अभियांत्रिकी सहा. ७२ असे पद आहेत. मा.धुमाळ साहेबानी प्रश्न विचारलेला आहे कोर्टाचे डायरेक्शन काय आहेत ते मी पुन्हा आपल्याला देतो. (मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या इंग्रजी डायरेक्शनचे वाचन केले) तीन महीन्यात राज्यशासनाने यावर निर्णय घ्यावा असे डायरेक्शन दिलेले आहेत.

**मा.बाबासाहेब धुमाळ** -  मा.महापौर साहेब, दोन महीने थांबावे आता पावसाळा आलेला आहे लोकांच्या घरामध्ये लहान लहान मुलं आहेत त्यांना आपण बेघर करणार का ? दोन महीन्यानी कोर्टात अपील करावे की असा असा आम्ही जी.बी.मध्ये ठराव करणार आहोत. आपण कायदयाच्या चौकटीत जावून काम करावे. कोर्टाकडून दोन महीने चार महीने मुदत वाढवून घ्यावी. कोर्टाने कायदा केलेला आहे तो गोरगरीब जनतेच्या हीतासाठी केलेला आहे. यामध्ये सॉलीसीटर नेमून मा.न्यायालयाला सांगावे.  कायदयात पळवाटा आहेत. सॉलीसीटर नेमावे काम

होईल त्यासाठी पैसे खर्च करा. शास्तीकराच्या बाबतीत मा.महापौर साहेब आपण आडीच वर्षे चांगले काम केलेले आहे. जाता जाता जनतेच्या  हितासाठी हे काम करावे. १०० रुपये टॅक्स असेलतर त्याने ३०० रुपये भरायचे हा कुठला जिजीयाकर आहे. मुघलांसारखे कर लावलेले आहेत तसा ठराव करुन महाराष्ट्र शासनाला कळवावे. हे नागरीक शास्तीकर भरु शकत नाहीत, शास्तीकर भरण्यासाठी नागरीक तयार नाहीत. आपण केलेला ठराव ते फेटाळतात आणि त्यांनी केलेल्या ठरावावर आपण उत्तर देवू शकत नाहीत का. आपल्याला तो जनतेन अधिकार दिलेला आहे हा ठराव फेटाळून लावावा. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आम्ही आपल्याला सांगीतलेल आहे आपण शांत राहून बुध्दीचातुर्यान काम कराव कारण येथे धुर्त मंडळी आहेत. बिल्डरला हाताशी धरुन वाट्टेल ते करायला लावतील चांगले काम करण्यासाठी आम्ही तूमच्या पाठीशी आहोत एवढेच सांगतो. जयहीन्द, जय महाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर ज्या दिवशी कोर्टाने हा निर्णय दिला. श्रीमती जयश्री डांगे केसमध्ये मी एका दुस-या कामासाठी हायकोर्टात होते. त्यादिवशी खरेतर त्या केसचा व या संदर्भाचा काही अर्थाअर्थी संबंध नसताना सुद्धा आमच्यातल्या एका सदस्यांने पिटीशनर यांना सांगितले व त्यांनी पिटीशन दाखल केले, या मागचा कर्ता करविता कोण आहे हे आख्या शहराला माहित आहे. ज्यांनी पिटीशन दाखल केल्या खरेतर त्यांचे त्याबद्दल मनापासून अभिनंदन. कारण माझा चुकीच्या कामाला कधीच पाठिंबा नाही. त्याच्या पाठिशी कोण होते ते मात्र संपूर्ण शहराला माहित आहे. अनधिकृत बांधकामे आजची झालेली नाहीत. म्हणून आज आंदोलन केले म्हणजे उद्या लगेच प्रश्न सुटला असेही नाही. हळद पीली म्हणून कोणी गोरे होत नाही. म्हणून तुम्हाला नावे ठेवून आम्ही स्वतःची पाठ थोपटून घेऊ इच्छित नाही. अनधिकृत बांधकामे निश्चितपणे अधिका-यांच्या आशिर्वादामुळे झाली आहेत. बांधकामात असलेल्या जाचक अटींमुळे जी अनधिकृत बांधकामे झाली आहेत. जे जे बिल्डर नगरसेवक म्हणून आज पद भोगत आहेत. त्यातले बिल्डर नगरसेवक आहेत. त्यांचे बांधकाम अनधिकृत आहे असे कळालेतर त्यांचे बांधकाम आपण अधिकृत केले. ४०,००० स्क्वे.फूटाचे बांधकाम अधिकृत केले. मा.श्रीकर परदेशी यांना इथे नावे ठेवली जातात. त्यांच्याकडूनच स्वतःची बांधकामे कायम करुन घेतली. वेळ पडली तर मी पुढील महापालिका सभेमध्ये शंभर टक्के कागदपत्रे घेऊन बोलणार आहे. राज्य शासनात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार आहे. सुपातले ते आंदणात, आणि आंदणातल जात्यात दळायचं. सुपातल्यांना पण माहिती पाहीजे आपल्याला कधीतरी जात्यात जायचेच आहे. नाटक किती दिवस करणार आहोत. प्रत्येक वेळी अधिवेशन आले की हा प्रश्न सुटेल सुटेल म्हणून गेली साडेचार वर्षे वाट पाहिलेली आहे. आम्ही सुद्धा या नाटकांना कंटाळलेलो आहोत. आम्ही सुद्धा कुठेतरी जातो. अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त करुन देणार नाही. इकडे दररोज अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त होतात. हा काही आपल्या अखत्यारीतला विषय नाही. शासनाच्या अखत्यारीतला विषय आहे. शासनाने विषय सोडवला पाहीजे. निश्चितपणे शासनाची जबाबदारी आहे. ते आपल्या जबाबदारीपासून पळत आहेत. जानेवारी २००८ नंतर झालेल्या बांधकामांना आपण तीन पट शास्तीकर लावला आहे. आयुक्त साहेब, हा शास्तीकर लावताना आपण मूळ रक्कम व त्याच्यावरील टॅक्स घ्यायला आपल्याला बंदी आहे का. बँकेची मंजूरी असेल, तुमची थकबाकी असेल तर त्यातील मूळ मुद्दल

व व्याज दोन्ही घेतात. गावातले असेलतर मूळ मुद्दल वसूल करतो. त्यासाठी लोकांची ना नाही. परंतू आपण काय करतो. तुम्ही सांगता पहिली शास्ती भरा. परंतू शास्ती लावली कशी. आपल्याला काही अधिकार आहेत. याठिकाणी माझ्याकडे बील आहे. पत्र्याची टेम्परररी शेड याला रु.१२,४८७/- शास्ती कर लावला आहे. लोड बेअरींगचे काम आहे. त्यापुढे गॅलरी होती, त्याला पत्र्याची शेड टाकली तर त्यासाठी सुद्धा रु.१२,४८७/- शास्तीकर लावला आहे. त्याचे बायफरकेशन आपल्या अधिका-यांनी दिले आहे. मूळ टॅक्स रु.८५०/- होता. पक्के बांधकाम केलेतर समजू शकतो. पण टेम्परररी शेड तो काढून टाकू शकतो. पण तुम्ही सांगितले होते. महापालिका जनतेच्या सेवेसाठी नसून सावकारी धंदा चालू केला आहे. तुमच्या सावकारी पाशात आमची सुद्धा भरड करताय. आपण सगळे मूळ टॅक्स घ्यायला हरकत नाही. सगळी टॅक्स बिले पाहीलीतर लक्षात येईल की, मूळ टॅक्स, अनधिकृत बांधकाम केले असेलतर ते व त्यावरील शास्ती सरसकट बेरीज करुन लोकांना टॅक्स पाठवला आहे. खरेतर त्यात आपण मूळ टॅक्स व शास्ती कर असे दोन वेगवेगळे कॉलम केले पाहीजेत. खाली मात्र बेरीज एकच केली आहे. माझे घर २००८ आधीचे घर असेल, ज्या वर्षापासून बांधकाम असेल तर त्या वर्षापासूनचा टॅक्स लावला आहे. आपल्याकडून अत्यंत जुलमी कारभार चालू आहे. महापालिकेची मिळकत कर वसूली ६० टक्क्यांपेक्षा कमी आहे. आतातर त्यापेक्षा जास्त खाली येणार आहे. त्या ६० टक्यांत आपण लोकांना सूट दिली व सांगितले, मूळ टॅक्स भरा. शासन शास्ती कराचा निर्णय खरोखर घेणार असेल तर येणा-या निर्णयाची वाट बघा. यामध्ये खरेतर आपलीच भूमिका सगळ्यांत महत्वाची आहे. यापूर्वी काही नवीन गावांसाठी असाच ठराव पाठवला होता व आपण शास्ती माफ सुद्धा केली होती. तसेच जुन्या गावांसंदर्भात सुद्धा केले पाहीजे. ४० टक्के लोक मोठ मोठे धेंड आहेत. त्यांच्या घरी जाऊन तपासणी केली का. तिथे टेप टाकला का. सर्वसामान्य घरांत टेप टाकून, मोजणी करुन ही नोंद केली आहे. बाल्कनीला केवळ ग्रील लावली तर त्या बाल्कनीला तुम्ही अनधिकृत घोषित करताय. कशाला अनधिकृत घोषित करायचे. चोरी होऊ नये म्हणून ग्रील टाकतात. घरात काही वाईट प्रकार घडू नये, लहान मुलांच्या संरक्षणासाठी ग्रील लावावी लागते. तुम्हाला त्याचे काही देणे घेणे नाही. सगळ्यांनाच शास्ती कराच्या बेरजा करायला लागलात तर आपले सुद्धा डोके चक्रावेल. आपण त्यात प्रशासकीय सेवा शुल्क लावले, सामान्य कर, वृक्ष कर लावला. रस्ता कर, शिक्षण कर व अनधिकृत बांधकाम शास्ती आहे. सगळे कर लावून रेडीरेकनरच्या तीनपट सरसकट मोजतो. एकिकडे बीआरटी धावण्यासाठी फूटपाथची जागा कमी करतोय. दुसरीकडे रस्ता कर लावतोय. आम्ही रस्ता कर देत असू तर तुम्ही फूटपाथ कमी करता कामा नये. आपली दुटप्पी भूमिका आहे. दोन्हीचा लाभ घ्यायचा म्हणताय मग हा कर कमी झाला पाहीजे, असे चालणार नाही. मी प्रत्येक प्रभागाच्या मिटींगला यावरुन जोरजोरात ओरडत असते. ड्रेनेज लाईन तुंबलेल्या असतात. एकच ठेकेदार संपूर्ण शहरभर काम करतो. मल प्रवाह सुविधा कर ५ टक्के घेतो. मग ड्रेनेज लाईन स्वच्छ होत नाहीत. त्याची बेरीज करुन शास्ती करात त्याचे तीन पट मोजलेले आहेत. मा.महापौर साहेब, खरेतर याचा कोणताही पॉलिटीकल इश्यू न करता आपण शासनाकडे कळवले पाहिजे, आम्ही हा शास्ती कर भरणार नाही, एवढीच विनंती करते. आयुक्त साहेब, आपण प्रशासनाला सूचना द्या. केवळ मूळ टॅक्स भरुन घ्या. बील भरले नाहीतर पुढील वर्षी त्या बीलावर सुद्धा व्याज लावू नये. ही वसूली दिवसेंदिवस न परवडणारी आहे. कंपन्या बंद होत आहेत. शहराचा

सहानुभूतिपूर्वक विचार करा. मा.महापौर साहेब, आम्ही शास्ती कर भरणारच नाही, असे आपण याठिकाणी जाहीर करा.

**मा.विनोद नढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी यंत्रणा उभी करण्यासाठी हा विषय आला आहे. गेले दोन अडीच वर्षांपासून अनधिकृत बांधकाम असेल, किंवा शास्ती कर असेल याचे भूत सामान्य माणूस असेल, राजकीय व्यक्ती असेल, प्रशासन असेल सगळ्यांच्याच मानगुटीवर बसलेले आहे. माझ्या मते तरी संपूर्ण राजकारण इथे होते आहे. कारण राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांची सत्ता आहे. कोणतीही राजकीय व्यक्ती असेल, किंवा कुठलीही सामान्य व्यक्ती असेल कोणत्याही व्यक्तीचे घर पाडावे असे वाटत नाही. निश्चितपणे मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री असतील, ते शासन स्तरावर सामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मा.मुख्यमंत्र्यांनी त्यासाठी तीन वेळा समिती देखील नेमली होती. हा जो निर्णय झालेला आहे तो कोर्टाच्या आदेशानुसार ही सर्व कारवाई चालू आहे. मुंबई इथे कॅम्पाकोला सोसायटीवर उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कारवाई करण्यात आली आहे. तिथे शिवसेनेची सत्ता आहे. असे असताना केवळ काँग्रेस व राष्ट्रवादीलाच यासाठी जबाबदार ठरवणे निश्चितच चुकीचे आहे. राज्य सरकार निश्चितपणे याबाबतीत प्रश्न सोडवण्यासाठी सकारात्मक पाऊल उचलते आहे. कमिटी नेमली आहे त्यात आयुक्त साहेब आपण देखील आहात. खरेतर शहरातील महत्वाच्या या प्रश्नासंदर्भात आपण नियोजन करावे अशी आशा व्यक्त करतो. शास्ती कराबाबतीत सामान्य व्यक्ती दिसते. परंतू तिच्या मनातल्या भावना, चलबिचल आपल्याला दिसत नाही. शास्ती कर कमी करण्यासाठी मा.महापौरांनी मागील सभेमध्ये पिठासिन अधिकारी देखील असताना निर्देश दिले होते की, शास्ती कर भरला जाऊ नये. तरीसुद्धा त्यानंतर जबरदस्तीने नागरीकांकडून शास्ती कर वसूल केला जातो आहे. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे, जोपर्यंत शासनाचे निर्देश नाहीत, तोपर्यंत शास्तीकर वसुल केला जाऊ नये. आयुक्त साहेब, आपण जी यंत्रणा निर्माण करताय, त्याच्या माध्यमातून महापालिकेला ५ ते ६ कोटी रुपये पगारापोटी कामगारांना द्यावे लागणार आहेत. यापूर्वी अनधिकृत बांधकामे खूप होती, त्यावेळी बीट निरीक्षक होते, ते असताना सुद्धा मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली. सर्वसामान्य नागरीकांना अधिका-यांचा वरदहस्त असल्यामुळे लोकांनी मोठ्या प्रमाणात घरे बांधली. निश्चितपणे हा मोठा प्रश्न आहे. राज्य शासन त्यावर लवकरत निर्णय घेईल परंतू शासन निर्णय घेत नाही, तोपर्यंत अनधिकृत बांधकामांबाबतीत कारवाई करु नये.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा शहरातील जिवंत प्रश्न आहे. आत्ता मला एक एसएमएस आला आहे की, एमपीसी न्यूजचा की, शिवसेनेने शास्तीकराबाबत आंदोलन केलेले आहे. परंतू हा प्रश्न कोणत्याही पक्षाचा प्रश्न नाही. शहरासाठी भांडणारे आम्ही सगळे आहोत. केवळ एक पक्ष भांडत नाही. हा प्रश्न प्रत्येकाच्या वॉर्डात आहे, प्रत्येकाच्या परिसरात आहे. त्यामुळे कोणी क्रेडीट घ्यायचे, न घ्यायचे राहीला हा प्रश्न. आजच्या तारखेला राज्यातील सरकार याबाबतीत कृतित्मक भूमिका घेतेय. निर्णय जाहीर केलेला आहे. मुंबईच्या आयुक्तांना व अन्य आयुक्तांना या समितीत घेतले आहे. हा प्रश्न निकाली लागावा म्हणून. वास्तविक पाहता शास्ती कर व अनधिकृत बांधकाम हे दोन वेगवेगळे मुद्दे आहेत. शास्ती कर हा शंभर टक्के शासनाच्या अखत्यारीतील

विषय आहे. शासन योग्य तो निर्णय घेऊ शकेल असा आहे. या विषयाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस तीव्र आहेत. शिवसेना सुद्धा तीव्र आहे. याचा आम्हाला सुद्धा आनंद होतो. हा ज्वलंत प्रश्न आहे. एक पट ऐवजी दोन पटीत बंद करा. एकूण ३ पट कर एक व उरलेला दंड दोन पट झाला. दिनांक ३ जानेवारी २००८ पासून २००८ नंतर झालेल्या बांधकामांना शास्ती कर लागू केला गेला. सांगवी परिसरात अशी परिस्थीती आहे. ग्रामपंचायत काळातील काही बांधकामांना नोटीसा दिल्या गेल्या आहेत. आपल्याकडे नोंदी आहेत. लेखाजोखा आहे. आम्ही मोघम बोलत नाही. जर २००८ पूर्वीची बांधकामे दिसत असतील, त्या पूर्वी झालेली आहेत ते सिद्ध होत असतील तर नोटीस देणे अत्यंत चुकीचे काम झाले आहे. प्रत्येकाच्या वॉर्डातील, प्रभागातील कर संकलन विभागीय कार्यालयातून बघितले तर प्रत्येक नगरसेवकाच्या लक्षात येईल की, २००८ पूर्वीच्या बांधकामांना ज्या नोटीसा दिल्या आहेत हे शंभर टक्के चुकीचे आहे. शासनाने धडधडीत तारीख दिलेली आहे. दि.०३/०१/२००८ पूर्वीची कौलारु घरे असतील, पत्र्याची घरे असतील, टप-या असू द्यात, कोणत्याही प्रकारचे बांधकाम असू दे, त्या बांधकामांना पुरावे असतील तर आपल्या करसंकलन विभागाकडून किंवा स्थापत्य विभागाकडून या बांधकामांना कोणत्याही प्रकारे अनधिकृत बांधकाम म्हणून मोजता येणार नाही. आज शहरात काय परिस्थिती आहे. ठिकठिकाणी शास्ती कर भरावा लागतो आहे. जून, जुलैमध्ये या प्रश्नाला प्रचड वाचा फुटते. करसंकलन कार्यालयासमोर लोक कसे रांगा लावून टॅक्स भरतात हे सगळे जग बघतेय. आज हा जो महापालिकेचा विकास केला आहे, तो जनतेच्या पैशांवर केला आहे. शासनाला याची अपेक्षा असेल की, कोणत्याही परिस्थितीत हा शास्ती कर रद्द करण्यासाठी अशी उपाययोजना करणारच आहोत. परंतू अशा पद्धतीने स्थानिक प्रशासनाने आपल्या महापालिकेने त्या-त्या नगरपालिकांनी, महापालिकांनी जी कटऑफ डेट शासनाने दिलेली आहे. तुमच्याकडे जमा झालेला कर रु.१००/- जमा झाला असेलतर केवळ ५० टक्के त्यांनी दिलेल्या मुदतीतील असेल, ५० टक्के पूर्वीच्या बांधकामांचा आहे तर तो आपण चुकीच्या पद्धतीने घेऊ नये. सर्व उपस्थित माननीय पत्रकार बंधू भगिनींना विनंती आहे की, प्रत्येक जण नागरीकांच्या या ज्वलंत प्रश्नावर भांडतोय. केवळ शिवसेना, भा.ज.पा. मुळे होणार आहे अशा प्रकारेच वातावरण शहरात तयार होते आहे. असे नाहीतर यासाठी आम्ही सुद्धा प्रयत्न करतच आहोत. या प्रश्नाला वाचा फुटली आहे. याचा निर्णय आपल्यापर्यंत येण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली शहरातील प्रमुख्यांच्या नेतृत्वाखाली शासनाकडे जाऊन योग्य तो निर्णय घेऊ व शहरवासियांना दिलासा देऊ.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २००८ नंतरची बांधकामे, अनधिकृत बांधकामांवर शास्ती कर, मुळात हा जो कर आहे, त्याबाबत बोलत असताना शासनामार्फत निर्णय सभागृहात आला होता. त्यावेळी सभागृहाने हा विषय फेटाळून लावला होता. फेटाळून लावला असताना सुद्धा शासनाने खरेतर जबरदस्तीने लागू केला आहे. जसे अनधिकृत बांधकाम हे बेकायदेशीर आहे असे म्हणतो. तसा हा शास्तीकर इलिगल आहे. मग २००८ आधी जी अनधिकृत बांधकामे लोकांनी केलीत त्यांना हा कर का नाही. रेट्रोस्पेक्टीव्ह लावता येत नाही म्हणून प्रॉस्पेक्टीव्ह लावला. लोकांना नोटीसा दिल्या. २०१० ला लोकांना कर वसूल करण्यासाठी शास्ती कर लागू केला. सर्वांनी त्यांच्या भाषणात व्यथा व्यक्त केली आहे. काहींची सूचना असणार आहे. सर्वांनी सांगितले. मी स्वतः राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने सर्व गटनेत्यांना विनंती आहे, कोणीही शास्ती

कर भरु नये असे नागरीकांना आवाहन करा. काय कायदेशीर व्हायचे असेल ते कायदेशीर होऊ द्या. आपल्या पक्षाच्या वतीने सर्व गटनेत्यांना नागरीकांनी सूचित करावे, बेकायदेशीर बांधकामे करु नयेत व शास्ती कर सुद्धा भरु नये. कोणताही गुन्हा असलातरी त्याला शिक्षा एकच असते. गुन्हा कधीही उघडकीस आला मग तो १० वर्षांनी उघडकीस आलातरी त्याला शिक्षा एकच असते. मग २००८ पूर्वी ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले, त्यांना काहीच शिक्षा नाही. २००८ नंतर बांधकाम केले त्यांना शास्ती कर लागू आहे, हा निर्णयच मुळात चुकीचा आहे. प्रशासन त्यात असेल, जाचक अटी असल्यातरी यावर अनेक वेळा ऊहापोह झाला आहे. आपण त्या समितीत आहात म्हणून सांगू इच्छितो, पिंपरी चिंचवड महापालिकेचा ओव्हरऑल डेट पाहीलीतर ही खूप तरुण महापालिका आहे. ग्रामपंचायती नंतर नगरपालिका झाली. नगरपालिका झाल्यानंतर लगेच महानगरपालिका झाली. त्यावेळी त्यांनी लोकांना दिलेल्या परवानग्या, त्यानुसार तशी घरे बांधली. मग या घरांना बेकायदेशीर म्हणू शकतो का. असे म्हणू शकत नाही. सी.एम. यांच्या समोर राष्ट्रवादीचा त्यात भाग आहे दोघे मिळून सरकार चालवत आहेत. सरकार निर्णय घेण्यात असमर्थ ठरते आहे. हे सुद्धा आम्ही मान्य करतो. परंतू त्यांना निर्णय घ्यावाच लागणार आहे. नाहीतर त्याचा परिणाम सुद्धा त्यांना भोगावा लागणार आहे. आत्ता जसा मा.आर.एस.कुमार, मा.दत्ता साने यांनी उल्लेख केला. यात वेगवेगळी कारणे आहेत. जर मुंबई शहरात ४/५ एफ.एस.आय देतो, बेंगलोरला ३ एफ.एस.आय. आहे, हैद्राबादमध्ये ५ एफ.एस.आय देतो, म्हाडाच्या स्किममध्ये अडीच एफ.एस.आय देतो. असे असताना कुठेतरी यायला पाहीजे. मा.मुख्यमंत्री म्हणतात, उल्हासनगरच्या धर्तीवर मला करायचे नाही. संपूर्ण राज्याचा विचार करुन करायचे आहे. मग जे काही करायचे आहे, तो एफ.एस.आय बाबतीत निर्णय झाला पाहीजे. मा.अजितदादा पवार व मा.मुख्यमंत्री इथे आले होते, तेव्हा म्हणाले, एक महिन्यात निर्णय देऊ. त्यांना वारंवार सांगतोय. अजूनही यावर निर्णय केलेला नाही. ही आमची सर्वांची, सत्ताधा-यांची सुद्धा नाचक्की आहे. निर्णय घेत नाहीत. आयुक्तांसमोर बोलून बोलून तरीसुद्धा आयुक्त साहेबांकडे सोल्युशन नाही. जोपर्यंत राज्य शासन यावर निर्णय घेत नाही. तुम्हाला निर्णय घेणे गरजेचे आहे. आत्ता विषय आपल्यासमोर आलेला आहे. विषय करायचा नसेल तर आपण नाही म्हणावे. करायचा असेल तर आपण हो म्हणू या. निर्णय घ्यावा लागेल. कोर्टाने डायरेक्शन्स दिल्या होत्या. ऑलरेडी २ महिने पूर्ण होतील. जी.बी. तहकूब होते. आज निर्णय घ्या. आम्हाला मंजूर नाही. आम्हाला करायचे नाही. आपण घेतलेला निर्णय शासनाला कळवू या. कमिटमेंट आहे. कोर्टाचा अवमान होऊ नये. कायद्याचा अवमान करायचा नाही. आम्हाला हा विषय मान्य नाही. आम्हाला करायचा नाही. याची आर्थिक बोजा कोण सांभाळणार आहे. पुढे एल.बी.टी. राहणार का नाही. असे अनेक प्रश्न आमच्या समोर आहेत. आमची धारणा आहे. मा.महापौर साहेब, पहिल्यांदा राज्य शासनाने पूर्वीच्या अनधिकृत घरांचा निर्णय घ्यावा. शास्तीकर रद्द करावा. नाहीतर तोपर्यंत अन्य कोणताही विषय आणू नये असे स्पष्ट आदेश द्यावेत. एकदा निर्णय झाल्यावर संरक्षण मिळाले तरी कोणत्याही पक्षाला वाटत नाही, बेकायदेशीर बांधकामे इथून पुढे व्हावीत. झालीत ती रेग्युरलाईज व्हायला पाहीजेत. संरक्षण मिळाले पाहीजे. शंभर टक्के शास्ती कर रद्द झाला पाहीजे. सभागृहाला वाटते, मनसे असेल, शिवसेना असेल, राष्ट्रवादी पक्ष असेल सर्व पक्षांची मूळ मागणी आहे. असे असताना राज्य शासन निर्णय घेत असताना चुकीचा निर्णय घेतला आहे हेही मान्य करतो. शास्तीकर भरु नये. लोक मूळ टॅक्स देतात, तो मूळ टॅक्स तुम्ही घेत नाही त्यामुळे त्यावर सुद्धा व्याज चालू होते

आहे. आपल्या ठरावासंदर्भात चर्चा होते आहे. आम्ही प्रयत्न करतोय. मूळ टॅक्स आपण घ्यावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो. आम्ही ज्या भावना व्यक्त केल्यात, त्याचे मिनिटस् करुन शासनाकडे पाठवावेत. सर्व पक्षांनी मिळून ठरवले आहे, कोणत्याही परिस्थितीत शास्ती कर भरणार नाही. शासनाने निर्णय घ्यावा. तशा प्रकारचे आदेश द्यावेत अशी विनंती करतो. आयुक्त साहेब, आपल्याला सुद्धा विनंती आहे, हा निर्णय होईल तेव्हा होईल. या सर्व गोष्टी लक्षात घ्याव्यात. बिल्डींग परमिशन घेत असताना एन.ए. करण्यासाठी किती पैसा लागतो, संपूर्ण मोजणी करण्यासाठी किती पैसे भरावे लागतात. आपल्याला माहीत आहे. अशा अनंत अडचणींमध्ये लोकांनी स्वतः विकत घेतलेल्या जागेवर घर बांधले आहे ते बेघर होऊ नये. जे गरीब लोक आहेत. बाहेर देशातून आलेले आहेत. पोट भरण्यासाठी इथे आले आहेत. शहरे झोपडपट्टीविरहीत व्हावीत अशी केंद्र शासनाची पॉलिसी आहे. आपल्या महापालिकेच्या वतीने स्लममधील लोकांना पक्की घरे देत असताना कष्टाने बांधलेली पक्की घरे तोडू नयेत. आपण या कमिटीत असताना निर्णय कसा लवकर होईल असा आपण प्रयत्न करावा. आज सुद्धा काही ठिकाणी शहरात अनधिकृत बांधकामांना सुरुवात झाली आहे. कृपया ती सुद्धा तुम्ही ताबडतोब थांबवावीत. नाहीतर आम्ही ऐकणार आहोत का. हे पाडले, ते पाडले. मागे शहरात जी अनधिकृत बांधकामे झाली ती झालीत. यापुढे होता कामा नये. आपण कृपया याची नोंद घ्यावी.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जवळजवळ गेले दोन तास या विषयावर, आजच नाहीतर गेले कित्येक महापालिका सभांमध्ये शास्ती कर असू दे, अनधिकृत बांधकामाचा विषय असू दे, रेड झोन असू दे कायम चर्चा करत आलो आहोत. सगळ्यात महत्वाचा मुद्दा यात आमची कोणाचीच चूक नाही. प्रशासनाच्या, कर्मचा-यांच्या चूका आहेत. ज्यावेळी अनधिकृत बांधकामे झाली, इमारत उभी करताना त्याचे फाऊंडेशन होते, पिलर्स उभी केली जातात. पहिला स्लॅब टाकला जातो, त्यावेळी कोणाच्या लक्षात येत नाही का. आम्ही कशासाठी जबाबदार आहोत. अनधिकृत बांधकाम दिसत असेलतर पहिल्या स्लॅब पडतो त्यावेळीच का पाडत नाहीत. आजही अनधिकृत बांधकामे चालू आहेत. हे सगळे करत असताना इथे जे बरेच नगरसेवक बसलेले आहेत, त्यांना सगळ्यांना या गोष्टीला फेस करावे लागते आहे. म्हणून रेडझोन बाबत आम्ही असेच म्हणतो. आम्ही पिंपरी चिंचवड महापालिकेत नवीन गावे समाविष्ट करुन घेतली त्यावेळी डिफेन्स यांना रेड झोन यांना कळाला नाही का. त्यावेळी ही गावे घेतलीच नव्हती पाहीजे होती. पुढे २ विषय गावे समाविष्ट करुन घेण्याबाबतचे आहेत. आम्ही ही गावे घेणारच नाही आहोत. पहिली जी गावे घेतली आहेत त्यांना सुविधा देऊ शकत नाही मग ही गावे समाविष्ट करुन काय करणार आहोत. १९९७ साली जेव्हा गावे महापालिका हद्दीत समाविष्ट करुन घेतली होती, ज्यावेळी निवडणूक लागली त्यावेळी पहिल्या निवडणुकीत केलेला खर्च, आजपर्यंत केलेला खर्च याचा विचार करत असताना त्यावेळी रेड झोन कुठे गेले होते. आज लोकांना सुविधा द्यायच्या नाहीत. आणि त्यांच्यावर टॅक्स मात्र लावायचा. आपण वृक्ष कर लावतो. आपल्याकडे वृक्षांची काय देखभाल होते ते सांगा. आम्ही नगरसेवक स्वखर्चाने वृक्षारोपण करतो. तुम्ही वृक्ष कर लावत असलातर त्याचे मेटेनन्स किती सुंदर पद्धतीने केले जावे. परदेशांत वृक्षांचे मेंटेनन्स कसे केले जाते हे या लोकांनी तिथे जाऊन आल्यानंतर त्याचे प्रेझेंटेशन दिले होता का. इथे चांगले काहीतरी करु या. मग हा वृक्षकर कशासाठी लावता. सगळे कर आहेत. त्यात एक कर आहे ड्रेनेज कर. ड्रेनेज

तुंबले तर दररोज फोन करावा लागतो. मग आपण अधिका-यांना पगार कशासाठी द्यायचा. दिवसभरात कमीत कमी चार तरी फोन करावे लागतात, आज ड्रेनेज चोकअप झालेले आहे. आम्ही फोन लावायचा, मग तो ठेकेदार तिथे जाणार. तो महापालिकेकडून पैसे घेतो व नागरीकांकडूनही पैसे घेतो. त्याशिवाय कामच करत नाही. इथे नागरीकांची पिळवणूक करुन, कर सुद्धा लावणार. इथे जेवढे लावलेले कर आहेत, ते सगळे किती लावायचे आणि किती वसूल करायचे हा सुद्धा प्रश्न आहे. तुमचा आजचा मूळ विषय आहे. जरी कोर्टाचा आदेश असला तरी प्रत्येक नागरीक व नगरसेवकाचे मत आहे की, शास्ती कर भरणार नाही. असे आजचे मत आहे. तुम्ही बुलडोजर घेऊन गेलात, सगळ्या नगरसेवकांना माझी विनंती आहे की, ठाण्यात जसे सगळे नगरसेवक बाहेर येतात. तसे तुम्ही या, आम्ही तुम्हाला बघतो. आमचे नगरसेवक पद एकदा घालवून तर बघा. नागरीकांसाठी जगणार नसलो तर आम्ही नगरसेवक होऊन काय फायदा. मूळ विषय अनधिकृत बांधकामाचा विषय आम्हाला मान्य नाही. आम्ही मान्यता देणार नाही. तुम्हाला करायचा असेल तर करा. लोकांची घरे पाडण्यासाठी आमची चूक नसताना अधिका-यांची चूक असताना एवढा खर्च होऊ दिलातर ती घरे पाडताना बघण्यासाठी आज पुन्हा या अधिका-यांना एवढा पगार द्यायचा, हे खरेतर चुकीचे आहे. एवढ्या लोकांचे पगार कुठून करणार. कशासाठी काम करणार तर अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी. माझ्याकडे उपसूचना आहे, त्यात अजून पदे लागणार आहेत असे लिहीलेले आहे. परंतू आम्हाला हाच विषय करायचा नाहीतर उपसूचना कुठून घेणार. हे आम्हाला परवडणारे नाही. आम्हाला हा विषय मान्य नाही. जो काही खुलासा असेल तर तो स्पष्ट व्हावा. ज्यांचा पगार करायचा तो कशासाठी करायचा. आम्हाला मुळात सुद्धा मान्य नाही. सभागृह सुद्धा या गोष्टीसाठी सहमत असेल. या दृष्टीकोणातून कळवा, आम्हाला विषय मान्य नाही. ज्या अधिका-यांमुळे घरे वाढली आहेत, ते अधिकारी व तुम्ही बघून घ्या. आम्हाला मध्ये घेऊ नका. लोकांनी घरे घेऊ नयेत अशी परिस्थीती झाली आहे. संध्याकाळी रस्त्यावर झोपडी टाकायची अशी पद्धत चालू होईल. सकाळी उठून लोक कामावर निघून जातात. अशी पद्धत सुरु करायची आहे का ते बघा. काही ठिकाणी असे सुरु झालेले आहे. घर बांधायला शहरात त्रास होणार असेलतर ते न बांधलेले योग्य. ग्रामपंचायतीतील सदस्य आणि आता नव्याने निवडून आलेले सहकारी नगरसेवक यांना वाटते आहे, कुठे एवढा खर्च करुन निवडून आलो. नवीन नगरसेवकांना फक्त त्रास आणि त्रासच आहे. दुसरी कोणती गोष्ट नाही. पूर्वीच्या लोकांच्या काळात काहीतरी कामे झालीत. पण यांच्या कारकिर्दीत २५ लाखाचे एकतरी टेंडर झाले आहे का. आयुक्त साहेब, तुमची कमिटमेंट होती की, आचारसंहिता संपल्यानंतर एक आठवड्यात टेंडर काढणार आहोत. कोणत्याही अधिका-याला त्याची जबाबदारी किंवा काळजी आहे का. प्रत्येक वॉर्डात फक्त २५ लाखांचे ४/४ टेंडर काढले आहेत. काम करायचे नाही. गेली ४ वर्षे शहरात प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डात कोणत्याही पद्धतीने काम झालेले नाही. आम्ही मात्र या सगळ्या पापाचे भागीदार व्हायचे नाही. आयुक्त साहेब, तुम्ही सरकारला कळवा, जे काही व्हायचे असेल ते होऊ द्या. शास्तीकराचे वेगवेगळे टप्पे करा. मूळ टॅक्स घ्या. शास्तीकर वजा होतो, मूळ रक्कम तशीच राहते, त्यावर व्याज दर लावता. नाहीतर तुमची महापालिका चालणार नाही. सगळ्यांनाच सांगणे आहे की, टॅक्स भरला नाहीतर महापालिका कशी चालणार आहे. शासनाची मंजूरी असलीतरी शासनात हे असे झाले,तसे झाले, आत्ता सकाळी आदरणीय अजितदादांशी याविषयावर चर्चा झाली. परंतू राष्ट्रवादी पक्षाचा खूप पाठपुरावा चाललेला आहे. मा.मुख्यमंत्री म्हणतात, आज निर्णय देऊ, उद्या निर्णय देऊ. म्हणून राग येण्याचे कारण

नाही. वेळ आलीतर नागरीकांनी रस्त्यावर यायची सुद्धा वेळ येणार आहे. आज या विषयासाठी कोणीही शास्तीकर भरायचा नाही असे ठरले आहे. हा विषय आम्हाला मान्य नाही हे सांगते.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शास्तीकराच्या विषयाच्या अनुषंगाने सर्वांनी आपआपली मते व्यक्ती केली आहेत. सगळ्यांचा या विषयाला शंभर टक्के विरोध आहे. नागरीकांना प्रचंड त्रास होतो आहे. मला एक मुद्दा म्हणायचा आहे, आपण शास्ती करात मूळ टॅक्स व शास्ती कर अशी नोटीस पाठवतोय. आमची आयुक्त साहेबांना विनंती राहील की, मूळ टॅक्स नागिरकांकडून वसूल करुन घ्यावा. शास्तीकर लावतोय तो बाजूला ठेवावा. शासन निर्णयानंतर शास्ती कर रद्द झालातर लोकांचे पैसे माफ होतील. यातून निश्चितपणे मार्ग काढलातर लोकांना खूप मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल. शासनाने हा निर्णय घेतला आहे. हा निर्णय शासन घेत असताना हा दंड आधी वसूल करावा असा निर्णय नसेल तरी तुम्ही यावर खुलासा केलातरी मूळ टॅक्स पहिला जमा केलातरी पहिल्या वर्षी जो दंड लावण्यात आला, त्यावेळी मूळ टॅक्स भरुन घेतल्यानंतरही त्यावर दंड का ठेवला गेला. या वर्षी अनेक नागरीकांनी दंड भरलेला आहे. आम्ही सगळ्यांना सांगतो, टॅक्स भरु नका. टॅक्स भरला नाहीतर महापालिकेला मूळ टॅक्सची रक्कम मिळणार नाही. म्हणून यावर आयुक्त साहेबांनी खुलासा केला, लेआऊट काढला तर निश्चितपणे नागरीकांच्या दृष्टीने खूप चांगले होईल.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कोणत्याही परिस्थितीत आपल्याला कोर्टाचा अवमान करायचा नाही. कोर्टाचा मान ठेवत असताना नागरीकांच्या तीव्र भावना लक्षात घेता अनधिकृत बांधकाम, शास्तीकराचा विषय जोपर्यंत शासन निर्णय घेत नाही, तोपर्यंत या संबंधी नागरीकांचा आदर राखत असताना हा विषय करायचा नाही. यात महापालिकेचे सुद्धा नुकसान होणार आहे. त्याची तजवीज कशी केली आहे. याचसाठी सदरचा ठराव हा दप्तरी दाखल करणेत यावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – हा सर्व नागरीकांचा ज्वलंत प्रश्न आहे. शास्ती कर कोणी भरू नये हे मान्य केले आहे. कोर्टाचा अवमान होणार नाही याची काळजी घेतली आहे. हा विषय दप्तरी दाखल करणेत येत आहे. अनधिकृत बांधकामांना नोटीस देताय, त्या पूर्ण बंद कराव्यात. या नोटीसा देऊ नयेत. नागरीकांनी सध्या शास्ती कर भरायचा नाही. मूळ टॅक्स आपण भरावा असा आदेश देते. हे सर्व उद्यापासून लगेच चालू करावे. आधी दिलेल्या नोटीसा देणे बंद करा किंवा नागरीकांनी नोटीस घ्यायची नाही. उपाययोजना म्हणून नोटीस देणे बंद करा व शास्तीकर रद्द करा. आयुक्त यांनी हे सर्व आदेश सर्व अधिका-यांना द्यावेत.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ४८७
दिनांक - ४/७/२०१४

विषय क्रमांक - ५
विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दवनि/६/कावि/५६/२०१४
दिनांक - २०/ ०६/ २०१४

**विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.**

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/६१६/२०१४
दिनांक – २३/०७/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.